


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. १४ नोव्हेंबर २०२५




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४ थे | अंक : 00५ | किंमत : ४.00 रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# पुण्यातील नवले पुलावरील अपघातात आठ ठार



पुणे : (समर्थ गांवकरी)

ब्रेक निकामी होऊन नियंत्रण सुटलेल्या कंटेनरने १० ते १२ वाहनांना धडक दिल्याने लागलेल्या भीषण आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी सायंकाळी पुण्यातील नवले पुलावर घडली. या अपघातात ९ ते १० जण गंभीररित्या जखमी झाले आहेत. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास साताऱ्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर हा अपघात झाला. अग्निशामक दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवत जखमींना बाहेर काढून जवळील रुग्णालयात दाखल केले. महापालिकेचे लायगुडे रुग्णालय, कमला नेहरू रुग्णालय येथून रुग्णवाहिका, डॉक्टर, नर्स यांचे पथक घटनास्थळी पाठविण्यात आले. नवले रुग्णालयासह अन्य खासगी रुग्णालयात

## कंटेनरची वाहनांना धडक

जखमींवर उपचार सुरू केले आहेत. या मोहिमेत ३५ ते ४० अग्निशामक जवान आणि सुमारे १०० अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले. साताऱ्याकडून येणारा कंटेनर अचानक नियंत्रण सुटून समोरच्या वाहनांना जोरदार धडक देत आला. काही क्षणात त्याने समोरील वाहनांना धडक दिल्यानंतर कंटेनर आणि मोटारीला आग लागली. माझ्या डोळ्यासमोर लोक जळत होते. मी धाव घेऊन त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला; पण तेवढ्यात गाडीने मोठा पेट घेतला आणि सर्व काही क्षणात संपले, असे सांगताना आरोही फर्निचरचे संजय सोळंखी यांच्या डोळ्यांत भीषण घटनेचे प्रतिबिंब स्पष्ट दिसत होते.

## 'देवदूत' बनून धावली पुणे महापालिकेची यंत्रणा

नवले पूल येथे गुरुवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातानंतर पुणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने तत्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. तीन वाहनांना आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन विभागाची तीन फायर इंजिन, दोन रेस्क्यू व्हॅन, तसेच 'पीएमआरडीए'च्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशामक दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवत जखमींना बाहेर काढून जवळील रुग्णालयात दाखल केले. महापालिकेचे लायगुडे रुग्णालय, कमला नेहरू रुग्णालय येथून रुग्णवाहिका, डॉक्टर, नर्स यांचे पथक घटनास्थळी पाठविण्यात आले. नवले रुग्णालयासह अन्य खासगी रुग्णालयात जखमींवर उपचार सुरू केले आहेत. या मोहिमेत ३५ ते ४० अग्निशामक जवान आणि सुमारे १०० अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले. महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी अधिकाऱ्यांना तत्काळ घटनास्थळी पाठवले. अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, पृथ्वीराज बी.पी., सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. संजीव वावरे आदी अधिकारी घटनास्थळी आणि रुग्णालयांमध्ये उपस्थित होते. नवले रुग्णालयात दहा जखमींवर उपचार सुरू आहेत किरकोळ जखमी असलेल्या नागरिकांना रुग्णालयातून सोडण्यात आले आहे, अशी माहिती डॉ. संजीव वावरे यांनी दिली.

# युतीची चिंता करू नका, जे काम केले त्यावरच निवडणूक लढवा

मुंबई : (समर्थ गांवकरी)



■ एकनाथ शिंदे यांचे आदेश; निवडणुकीची जबाबदारी आमदार-खासदारांवर

मुंबईतील आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी नंदनवन निवासस्थानी महत्वाची बैठक बोलावली. या बैठकीला मुंबईतील आमदार, खासदार तसेच महत्त्वाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणूक जवळ येत असताना, मागील दोन-अडीच वर्षात झालेल्या कामांचा आढावा घेणे आणि पक्षाची संघटन रचना मजबूत करणे या दोन्ही गोष्टींवर शिंदे यांनी भर दिला. यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शिवसेनेसोबत राहून त्यांच्यावर विश्वास ठेवत आलेल्या नगरसेवकांना पुन्हा निवडून आणणे ही जबाबदारी प्रत्येक आमदार व खासदाराने स्वीकारावी.

बैठकीदरम्यान शिंदेंनी सांगितले की, 2022 पासून त्यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत अनेक विकासात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीत हीच कामे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे निर्देश त्यांनी कार्यकर्त्यांना दिले. विशेषतः क्लस्टर डेव्हलपमेंट, कोस्टल रोड, मेट्रो प्रकल्प, गृहनिर्माण विभागाचे पुनर्विकास प्रकल्प अशा योजनांमुळे मुंबईच्या विकासाला मोठा वेग आला असून याचे माहितीपत्रक घरोघरी पोहोचवण्याचे आदेश त्यांनी दिले. आपण जे काम केले आहे त्यावरच निवडणूक लढवा, युतीची चिंता करू नका, असेही शिंदे कार्यकर्त्यांना म्हणाले. शिंदेंनी मुंबईतील घरकुलाच्या समस्येवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे संकेत दिले. मुंबईत स्वतःचे घर मिळावे ही प्रत्येक मुंबईकराची इच्छा आहे आणि ती पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात धोरणात्मक कामे सुरू आहेत, असे त्यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले. मतदानाच्या वेळी घरकुल, पुनर्विकास, क्लस्टर प्रकल्प, कोस्टल रोड आणि मेट्रोसारख्या विषयांवर जनतेशी संवाद साधण्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच, जो विश्वास ठेवून त्यांच्या नेतृत्वासोबत उभा राहिला त्या नगरसेवकांना पुन्हा प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे शिंदेंनी ठामपणे सांगितले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाचा त्याग करून शिंदे गटासोबत आलेल्या नगरसेवकांना युतीत योग्य जागा मिळवून देणे आणि त्या सर्वांना जिंकवून आणणे ही जबाबदारी पूर्णपणे आमदार आणि खासदारांच्या खांद्यावर दिली आहे. यामुळे या निवडणुकीत खासदार-आमदारांना प्रभागनिहाय रणनीती आखावी लागणार आहे. निवडणुकीत भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांची युती असल्याने जागावाटप कसे होणार यावर अजूनही चित्र स्पष्ट नाही. मात्र शिंदेंनी स्पष्ट केले की, युतीचे तांत्रिक निर्णय वरिष्ठ नेते घेतील आणि पदाधिकाऱ्यांनी आपल्या क्षमतेनुसार काम करत राहावे.

# छत्रपती संभाजीनगरमध्ये मुलीच्या तपासासाठी आईची आत्महत्या

छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)

■ नातेवाइकांनी मृतदेह आणला थेट ठाण्यात, रात्री उशिरापर्यंत पोलिसांची कारवाई

उस्मानपुरा भागात गुरुवारी (१३ नोव्हेंबर) सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास रेखा राजू जाधव (५०) या महिलेने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेनंतर नागरिकांनी मृतदेह थेट ठाण्यात आणत रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत ठिय्या मांडला. यामुळे उस्मानपुरा पोलिस ठाण्यासमोर तणाव निर्माण झाला.

या प्रकरणी मृत महिलेचा मुलगा विजय राजू जाधव (३३) याच्या फिर्यादीवरून आठ जणांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, जाधव यांची २१ वर्षांची विवाहित मुलगी ८ नोव्हेंबर रोजी घरातून निघून गेल्यापासून घरात तणावाचे वातावरण होते. बेपत्ता तरुणीच्या पतीने उस्मानपुरा ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दिली होती. दरम्यान, मुलगी बुलढाण्यात असल्याची माहिती ९ नोव्हेंबर रोजी पोलिसांना मिळाली. गल्लीतील एका व्यक्तीने तिला पळून नेल्याचे समोर आले, अशी माहिती नातेवाइकांनी दिली. परंतु रात्री उशीर झाल्याने पोलिसांनी दुसऱ्या दिवशी जाण्याचे सांगितले.

याच वेळी मुलीने जागा बदलल्याने ती सापडू शकली नाही. या सर्व घटनांमुळे रेखा या तणावात असल्याचे नातेवाइकांचे म्हणणे आहे.

मुलगी बेपत्ता झाल्यानंतर वाढलेल्या मानसिक तणावामुळे रेखा जाधव यांनी घरातच गळफास घेतल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. पोलिसांनी माहिती मिळताच त्या ठिकाणी जाऊन मुलीसह इतर संशयितांना ताब्यात घेतले असते तर ही वेळ आली नसती, असे नातेवाइकांचे म्हणणे आहे. मृत महिलेचा मुलगा रिक्षाचालक असल्याची माहिती देण्यात आली आहे.



# मिस्टर प्रेसिडेंट, तुम्ही चुकता आहात!



## संपादकीय




अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा सत्ता मिळवली खरी, पण त्यांच्या या नव्या सत्ताकाळात त्यांना अनेक आव्हानांना तोंड द्यावं लागतं आहे. सत्तेत आल्यानंतर पहिल्या वर्षभराच्या आतच त्यांच्या लोकप्रियतेत प्रचंड घट झाली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळाला एक वर्षही पूर्ण झाले नसताना अमेरिकन मतदारांनी त्यांचा 'मेक अमेरिका ग्रेट अगेन'चा नारा फिका केला आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये डेमोक्रॅट्सनी न्यू जर्सी, व्हर्जिनिया आणि कॅलिफोर्निया येथे ऐतिहासिक विजय मिळविला. या निकालांमुळे २०२६ मधील मध्यावधी निवडणुकांसाठी ट्रम्प व रिपब्लिकन पक्षाच्या स्थितीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आर्थिक अडचणी, जीवनशैलीची 'वाढती' किंमत आणि सर्वसामान्य जनतेच्या समस्या या सर्वच आघाड्यांवर ट्रम्प प्रशासन तोंडावर आपटलं आहे. यासंदर्भात झालेल्या एका नव्या सर्वेक्षणानुसार, अमेरिकेतील बहुतांश लोक देशाच्या दिशेबद्दल आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या कामकाजाबद्दल नाराज आहेत. अर्थव्यवस्था आणि महागाई या प्रमुख चिंता आहेत. ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या अधिकारांचा विस्तार केल्याबद्दलही लोकांमध्ये चिंता आहे. अमेरिकन नागरिक सध्या देश ज्या दिशेनं चालला आहे त्याबद्दल आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारभाराबद्दल अतिशय असमाधानी आहेत. ही नाराजी अर्थव्यवस्था ते स्थलांतर या महत्त्वाच्या मुद्द्यांपर्यंत पोहोचली आहे. या सर्वेक्षणानुसार ६७ टक्के अमेरिकी मानतात की, देश चुकीच्या मार्गावर चाललाय. ९५ टक्के डेमोक्रॅट्स आणि ७७ टक्के स्वतंत्र मतदार मानतात की, ट्रम्प देशाचं गाडं चुकीच्या दिशेनं हाकताहेत. यामुळे देशाचं मोठं नुकसान होईल. खुद्द ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाच्या २९ टक्के मतदारांनाही वाटतंय की, ट्रम्प उधळलेत. मनमानी आणि हटवादी पद्धतीनं ते देशाला वाट फुटेल तिकडे घेऊन जाताहेत. ८७ टक्के कृष्णवर्णीय, ७१ टक्के हिस्पॅनिक आणि ७१ टक्के आशियाई अमेरिकनांचंही हेच मत आहे. ६१ टक्के श्वेत अमेरिकन या मताशी सहमत आहेत. अर्थव्यवस्था आणि महागाई या लोकांच्या सगळ्यात मोठ्या चिंता आहेत. ५२ टक्के अमेरिकन्स मानतात की, ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर अर्थव्यवस्था बिघडली आहे. ५०,००० डॉलर्सपेक्षा कमी कमाई असणाऱ्या दहापैकी सुमारे सहा लोकांना वाटतं की, त्यांची आर्थिक स्थिती आधीपेक्षा वाईट झाली आहे. सुमारे ६० टक्के लोक सध्याच्या महागाईसाठी ट्रम्प यांना जबाबदार धरतात. यांपैकी एकतृतीयांश लोक तर म्हणतात, ट्रम्प यांनी सर्वसामान्य लोकांचं आणि देशाचंही वाटोळं केलं आहे. रिपब्लिकन मतदारांपैकीही पाचपैकी एक व्यक्ती ट्रम्प यांना दोषी मानते. ३७ टक्के लोक सांगतात, आमची स्थिती 'ना घर का, ना घाट का' अशी झाली आहे. ४५ टक्के लोक म्हणतात, आमच्या दुर्दैवाचे दशावतार आहे तसेच, मागच्या पानावरून पुढे सुरू आहेत. ट्रम्प यांच्या कामगिरीवर ५९ टक्के लोक नाराज आहेत. त्यांच्याबद्दलची तीव्र नाराजी (४६ टक्के) ही त्यांच्याबद्दलच्या तीव्र प्रशंसेपेक्षा (२० टक्के) दुपटीहून अधिक आहे. बहुतांश लोक टॅरिफ, अर्थव्यवस्था आणि फेडरल सरकारच्या व्यवस्थापनावर, त्यांच्या कामगिरीबद्दल अतिशय असमाधानी आहेत.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ३६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 7 | 1 | 4 | | | 2 |
| | 9 | | | | 8 | 4 | | |
| 3 | 7 | | | | 2 | | | |
| | 1 | 5 | 6 | | | 2 | 3 | 8 |
| | 4 | | | | | | 1 | |
| 9 | 2 | 8 | | | 3 | 7 | 4 | |
| | | | 4 | | | | 2 | 1 |
| | | 9 | 2 | | | | 5 | |
| 1 | | | 3 | 8 | 5 | | | |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ३५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 9 | 7 | 3 | 8 | 5 | 6 | 4 | 2 |
| 5 | 4 | 2 | 6 | 7 | 9 | 8 | 1 | 3 |
| 3 | 6 | 8 | 1 | 2 | 4 | 9 | 5 | 7 |
| 8 | 1 | 3 | 2 | 4 | 6 | 7 | 9 | 5 |
| 2 | 5 | 6 | 9 | 1 | 7 | 3 | 8 | 4 |
| 4 | 7 | 9 | 8 | 5 | 3 | 1 | 2 | 6 |
| 9 | 2 | 5 | 7 | 6 | 8 | 4 | 3 | 1 |
| 6 | 3 | 4 | 5 | 9 | 1 | 2 | 7 | 8 |
| 7 | 8 | 1 | 4 | 3 | 2 | 5 | 6 | 9 |

**पंचांग**
१४ नोव्हेंबर २०२५
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
कार्तिक शके
संवत्- १९४७

संवत्सर - विश्वावसूनाम
अयन- दक्षिणायान
मास- कार्तिक
ऋतु- सौर हेमंत
कृष्ण पक्ष
तिथि:दशमी

२४:५०:०३+
नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी
२१:२०:२४
योग:वैधृति ३०:२५:१६+
करण:वणिज १२:०७:३९
करण:विष्टि २४:५०:०३+

## उपदेशाचे डोस

### उंटाची दोरी !

एकदा एक अरब व्यापारी शंभर उंटांचा तांडा घेऊन चालला होता.दिवस मावळताना तो एका गावात आला. गावातल्या मशिदीत एक फकीर राहत होता. व्यापारी त्याच्याकडे गेला. नमस्कार करून म्हणाला,'मशिदीबाहेर मी माझे उंट बांधले आहेत.पण एका उंटाची दोरी व खुंटी वाटेत गहाळ झाली आहे.कृपया मला एक दोरी व खुंटी द्या !' त्यावर फकीर म्हणाला,'बांध रे तसाच बांध उंट!' व्यापारी पुन्हा म्हणाला ,'अहो,दोरी आणि खुंटी नाही.मग कसा बांधू?' यावर फकिर म्हणाला, 'चल मी बांधून दाखवतो उंट!' फकिर उंटाजवळ गेला. त्याच्याशेजारी खुंटी ठोकण्याचे नाटक केले.खुंतीला एक काल्पनिक दोरी बांधल्यासारखे केले आअणी दोरीची गाठ उंताच्या गळ्याला घट्ट बांधल्याचे नाटक केले. उंतावर एक थाप टाकली. आंइ आश्चर्य म्हणजे उंट खाली बसला. रात्रभर हलला नाही्. होता मोकळाच पण हलला नाही. सकाळी अरब जायला निघाला सगळे उंट उभे राहिले.पण हा उंट उठेचना. अरबाने फकिराला बोलावले.फकिर म्हणाला,'तसा कसा उठेल तो? त्याची दोरी सोडायला हवी!'असे म्हणून त्याने उंटाची दोरी सोडल्याचे,खूंटी उपटल्याचे नाटक केले. उंटह्गी लगेच उठला आणि अंग झटकून चालू लागला.

कथा उपदेश : जे सवयीचे गुलाम असतात,ते स्वातंत्र्य गमावतात !

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९९८ - इराकने शस्त्रतपासणीस होकार दिल्यामुळे इराकवर क्रूझ क्षेपणास्त्रे सोडण्याचा निर्णय अमेरिकेने बदलला.

### राष्ट्रीय

- १९६९ - नवी दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची स्थापना.
- १९९२ - अरुणा असफअली नेहरू पुरस्काराने सन्मानित.
- २००३ - भारतात २०१० मध्ये कॉमनवेल्थ क्रीडा स्पर्धा घेण्यास स्पर्धा समितीचा होकार.

### जन्म

- १६५० - विल्यम दुसरा, ईंग्लंडचा राजा.
- १८४० - क्लोद मोने, फ्रेंच चित्रकार.
- १८४३ - ऍलन हिल, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८६३ - लिओ बेकलंड, प्लॅस्टिकयुगाचा जनक.
- १८८९ - पंडित जवाहरलाल नेहरू, स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान.
- १९०४ - हॅरोल्ड लारवूड, इंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १९०८ - जोसेफ मॅककार्थी, अमेरिकन साम्यवाद-द्वेष्टा.
- १९२२ - बुट्रोस बुट्रोस-घाली, संयुक्त राष्ट्रांचा सरचिटणीस.
- १९२४ - रोहिणी भाटे, प्रख्यात नर्तिका.

### निधन

- ५६५ - जस्टिनियन, बायझेन्टाईन सम्राट.
- १७१६ - गॉटफ्रीड विल्हेल्म बनित्झ, या गणितीला यांत्रिक संगणकाचा जनक मानतात.
- १८६६ - मिगेल, पोर्तुगालचा राजा.
- १९०८ - गुआंग्क्सु, चीनी सम्राट.
- १९१४ - वेंगायिल कुन्हीरामन नयनार, मल्याळी लेखक, पत्रकार.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ३६



### आडवे शब्द

आडवे शब्द
१. पहारेकरी
६. टप्प्या-टप्प्याचा प्रवास
१२. माळ, हार
१३. नडलेला, गरजू
१४. डाळीचे कालवण
१५. सांभाळ, संगोपन
१७. गवताचे रुंद पान
१८. वेल
२०. शंभर
२२. प्रचंड
२४. आई
२५. गगन
२७. हद्दपार, वगळलेला
२८. कोय
२९. रोटीचे एक धान्य
३०. एक त्रिदल
३१. आवेशाने पुढे जाणे
३३. पोट
३४. सैन्याचा मालपुरवठा
३६. चिखलाची भुसभुशीत जमीन
३७. श्रीकृष्णाचे एक नाव
३८. रममाण, निमग्न
४०. कबूतर
४१. पुष्कळ
४३. हिंदुस्थानी
४५. भित्रा
४८. एक महाकाय प्राणी
४९. कुंभाराची भट्टी
५१. आत्मियता, करुणामय प्रेम
५२. पुरुष
५३. आकडेमोडीचे शास्त्र
५५. उद्योगी माणसाचा 'शत्रू'
५६. ठाकरे पुत्र
५८. भडीमार
५९. भीती
६१. रक्ताचा नात्यातील
६२. रतिचा पती
६५. आमनेसामने
६८. समुद्र
७०. ग्रामीण बोलीत तेव्हा
७१. जिम्मेदारी
७२. वेळ घालवणे
७४. अभिनेता
७५. त्वरित
७६. चप्पल
७७. गाय
७८. परंतु

### उभे शब्द

१. जीभ. जिव्हा
२. गाढव
३. निकट
४. दरवाजा
५. रात्र
६. हेतू-कारण
७. अंगावरील बारीक केस
८. फिर्याद, अर्ज
९. वाळवंट
१०. धरण, सरोवर, विहीर इ.
११. संगीतातील एक राग
१६. नकला करणारा
१७. सरसरीत
१९. धातूचा धागा
२१. मध
२२. सततचे नामस्मरण
२३. प्रत्येक वर्षी
२४. बिनविजेचा 'फ्रीज'
२५. आपला परका अशी भावना
२६. कपाळ
२८. स्वाभिमानी
२९. इंग्रजी आई
३१. कमीजबरोबरचे एक वस्त्र
३२. दात
३३. अगरबत्ती
३५. वेळ, फुरसत
३६. डोंगराचा तुटलेला कडा
३९. जरच्या बरोबरचा शब्द
४२. दाक्षिणात्य आमटी
४४. धनुष्यबाण
४६. भरीव नसलेले
४७. शिखराचे टोक
४९. व, आणखी
५०. कडक व चिवट
५२. एक क्षार
५४. फणसातील खाद्यभाग
५६. नाहक
५७. न्यूनता, कसर
६०. रसाळ
६१. मंत्रीमंडळ
६३. औषध
६४. हाकाटी, आरडाओरड
६६. मराठीत बाथरूम
६७. टोळी, सैन्याची तुकडी यांचा प्रमुख
६८. हिंमत, धैर्य
६९. तीव्र ऊन
७३. विहीर
७४. शर्त

### शब्दकोडे क्र. ३५ चे उत्तर

आडवे उत्तर : १.दीडशहाणा ४.तासभर ७.बेसुमार ९.नर १०.शराब ११.जकात १३.चाणक्य १४.बनकर १६.आरमार १७.टाळी १८.तात २०.श्वास २३.पळसाला तीन पाने २६.लघुकोन २८.काम २९.खासगी ३१.रजनीकर ३३.कस ३५.सनई ३६.रमा ३७.कमालकिमान ३८.उदास ४०.वीर ४१.नवा ४३.संबंध ४५.दामोदर ४७.तापट ४९.दीर ५०.नवनीत ५३.रण ५५.माग ५६.रडतराऊत ५७.नीलकंठ ५९.पुकारणे ६१.पकडणे ६३.आईवडील ६६.कर्मधर्मसंयोग ६९.हृतराजी ७०.तग ७१.कणकण

उभे उत्तर : १.दीन २.डरकाळी ३.हालचाल ४.तारा ५.सबब ६.रजक ८.मागोमाग १०.शक्यता १२.कार १५.नवसागर १६.आसपास १७.टाकी १९.तप २०.श्वान २१.सलगी २२.चकोर २४.तीरकमान २५.समई २७.नजरसमोर २८.कानन २९.खार ३०.जमावबंदी ३२.करवीरनगर ३४.सलवार ३५.समानता ३९.दादा ४२.बटण ४४.धरणीकंप ४६.पनीर ४८.परत ५१.तडक ५२.मीराबाई ५४.धनी ५५.माका ५८.ठकबाजी ५९.पुणेकर ६०.कालवण ६२.वसंत ६३.आग ६४.वहाण ६५.खंत ६७.धक्का ६८.योग

# जमिनीच्या वादातून गोळीबार; सहा आरोपींच्या आवळल्या मुसक्या

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

जमिनीच्या वादातून चुलत मामानं सहा जणाशी संगनमत करून भाच्यावर गोळीबार केल्यानं मोठी खळबळ उडाली. ही धक्कादायक घटना मंगळवारी रात्री भिवंडी तालुक्यातील देवरुंग गावाच्या परिसरात भर रस्त्यात घडली आहे. याप्रकरणी पडघा पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी आतापर्यंत चुलत मामासह ६ आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. रुपेश म्हात्रे, राकेश म्हात्रे, किसन म्हात्रे , भरत पाटील, विश्वनाथ पाटील, चेतन शिसवे अशी सहा अटक केलेल्या आरोपींची नावे असून चार दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. तर विकी दळवी (वय 28 रा. देवारुंग ) असं गोळीबारात गंभीर जखमी झालेल्या भाच्याचं नाव आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भाचा विकी दळवी हा भिवंडी तालुक्यातील देवरुंग गावात कुटुबीयांसह राहत असून याच भागात त्याचा चुलत मामा राहतो. त्यातच दोघा मामा भाच्यात जमिनीचा वाद सुरु होता. याच वादातून भाच्याला संपवण्याचा कट चुलत मामानं रचला अशी माहिती पोलीस तपासात समोर आली. विकी दळवी हा मंगळवारी रात्री ७ वाजताच्या वाजण्याच्या सुमारास, लोनाड गावात त्याच्या दुचाकीनं रुग्णालयात जात होता. यावेळी त्याचा चुलत मामासह इतर आरोपींनी दुचाकीवरून पाठलाग करत त्याला रस्त्यात गाठलं. देवरुंग गावाच्या हद्दीतील रस्त्यात आरोपींनी त्याच्यावर रिव्हॉल्व्हरमधून गोळीबार केला. या गोळीबारात भाचा विकी हा गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर कल्याण पश्चिम भागातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. गोळीबाराच्या घटनेनंतर पडघा पोलिसांनी बुधवारी बीएनएसच्या कलम 109(1) (हत्येचा प्रयत्न) आणि 3(5) (हेतू) आणि शस्त्रास्त्र कायद्याच्या तरतुदींनुसार चुलत मामासह सहा आरोपींना अटक केली. तर १२ नोव्हेंबरला सहा आरोपींना भिवंडी जिल्हा सत्र न्यायालयात हजर केलं असता, सहाही आरोपींना चार दिवसांची पोलीस कोठडी

देण्यात आली आहे. दुसरीकडं गोळीबार प्रकरणामुळे गावात तणाव पाहता पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला.



खोडद : फलटण येथील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी स्व. डॉ.संपदा मुंडे यांचा जुन्नर तालुका मेडिकल असोसिएशनच्या वतीने जाहीर निषेध करून दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी केली. मेडिकल प्रॅक्टिशन्स असोसिएशन ट्रस्टचे चेअरमन डॉ. प्रदीप जोशी यांनी डॉ. स्व. संपदा मुंडे यांना न्याय मिळावा, अशी मागणी तहसीलदारांना निवेदनाद्वारे देऊन या मागण्या शासनापर्यंत पोहचवावे, अशी विनंती केली. यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ. राहुल तांबे, डॉ. नागेश हिंमगिरे, डॉ. संदीप काकडे, डॉ. महादेव वाणी, डॉ. गणेश इंगवले, डॉ. आदित्य कुलकर्णी,डॉ. युवराज ढमाले, डॉ. निलेश थोरात, नारायण राठोड, डॉ. सुभाष जुन्नरकर, डॉ. विनोद केदारी, डॉ. प्रसाद शिंगोटे, डॉ. विशाल आमले, डॉ. अजित वलवणकर, डॉ. सोनिया केदारी, डॉ. सागर शिंदे, डॉ. सोहिल इनामदार, डॉ. अक्षय शेवाळे उपस्थित होते.

## थोडक्यात बातम्या...



### अतुल बेनके यांच्या निधीतून वरसुबाई मंदिर रस्त्याचे खडीकरण

जुन्नर तालुका (स. गांवकरी) : नेतवड माळवाडीतील कुटे मळ्यात वरसुबाई मंदिर ते कॅनाल या ५३० मिटर रस्त्याचे खडीकरण कामाचे भूमिपूजन करण्यात आले या कामासाठी माजी आमदार अतुल यांच्या प्रयत्नातून १० लक्ष् रुपये निधी देण्यात आला आहे.याशिवाय सभामंडप व रस्त्यांच्या दुरुस्ती व इतर महत्वाच्या कामासाठी देखील माजी आमदार अतुल बेनके निधी उपलब्ध करून देणार आहेत व त्या कामाची सुरुवात लवकरच करणार आहेत. या रस्त्याचं बुधवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी भूमिपूजन माजी जिल्हा परिषद सदस्य बबन तांबे यांचे शुभहस्ते करण्यात आले यावेळी नेतवड गावच्या सरपंच सुरेखा बटवाल तानाजी बटवाल,मनोहर बनकर डिंगोरे गावचे उपरपंच निलेश लोहोटे,संदीप शिंगोटे,समीर लोहोटे,माजी उपसरपंच नेतवड पोपट गायकवाड,आदिनाथ बटवाल पूनम बटवाल,नलिनी कुटे,पोलीस पाटील विलास बटवाल आणि नेतवड माळवाडी ग्रामस्थ उपस्थित होते सर्वांच्या उपस्थितीत भूमीपूजन संपन्न झाले.यावेळी जिल्हा परिषद गटातून माजी जिल्हा परिषद सदस्य बबन तांबे यांच्या पत्नी जयश्री तांबे यांचे नाव जवळपास निश्चित झाले असल्याने नेतवड ग्रामस्थांनी त्यांना संपूर्ण पाठिंबा दिला आहे.



### श्रीगोंदा निवडणूक : काँग्रेसकडून उमेदवारांच्या मुलाखती संपन्न

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रीगोंदा शहरातील कॉंग्रेस पक्षाकडून उमेदवार निवड प्रक्रियेला गती मिळाली आहे. नगरपरिषदेसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती आज घेण्यात आल्या. नगरसेवक पदासाठी ३७ तर नगराध्यक्ष पदासाठी २ उमेदवारांनी मुलाखती दिल्या. प्रांताध्यक्ष- श्री हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री श्री बाळासाहेब थोरात, आमदार श्री हेमंत तात्या ओगले, यांच्या सूचनेनुसार पक्षाच्या वतीने प्रदेश उपाध्यक्ष युवक काँग्रेस- प्रशांत ओगले, तालुकाध्यक्ष- संतोष भोईटे, शहर अध्यक्ष- अ‍ॅड. समित बोरुडे, तालुकाध्यक्ष युवक काँग्रेस श्री विकास काळे पाटील शहराध्यक्ष युवक काँग्रेस श्री मुझफ्फर मालजप्ते यांच्या उपस्थितीत मुलाखती पार पडल्या. उमेदवारांची निवड पक्षाच्या निकषांनुसार आणि कार्यकर्त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन करण्यात येणार असल्याचे पक्ष सूत्रांनी सांगितले. श्रीगोंद्यातील राजकीय वर्तुळात या मुलाखतींमुळे कॉंग्रेसच्या उमेदवारांच्या यादीबाबत उत्सुकता वाढली आहे. अंतिम यादी लवकरच जाहीर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### ‘आफ्टर ओएलसी’ चित्रपटात बॉस लेडी शिवानी सुर्वेचा नक्षल लूक



पुणे (स. गांवकरी) : 'आफ्टर ओएलसी’ चित्रपटाचं पोस्टर समोर आलं तेव्हापासून मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वे चर्चेत आली आहे. या चित्रपटातील आपल्या लाडक्या शिवानीचा एक वेगळाच नक्षल, डॅशिंग, रावडी लूक पाहून साऱ्यांच्या नजरा वळल्या. अर्थातच शिवानी ’आफ्टर ओएलसी’ या चित्रपटातून नेहमीपेक्षा एका वेगळ्याच भूमिकेतून दिसणार आहे. नक्षलवादी वेशात दिसणाऱ्या या लूकसाठी शिवानीने बरीच मेहनत घेतली आहे. इतकंच नाहीतर हा सिनेमा संपूर्ण भारतात मराठी, कन्नड, आणि हिंदी भाषेतही प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे कानडी भाषेसाठीही शिवानीने विशेष मेहनत घेतली. ’आफ्टर ओएलसी’ चित्रपटातील एकूणच लूकबाबत बोलताना शिवानीने म्हटलं, "आजवर मी जे सिनेमे केले आहेत त्यातील भूमिकांपेक्षा ही भूमिका वेगळी आहे. त्याहीपेक्षा भूमिकेसाठीचा लुक वेगळा आहे. माझा या चित्रपटात नक्षलवादी लुक आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक सडागारा राघवेंद्र यांनी माझ्या या लुकसाठी मेहनत घेतली आहे. body language, expression वर मी विशेष लक्ष दिलं. कानडी भाषा शिकण्यासाठी कर्नाटकला वर्कशॉपमध्येही बरीच मेहनत घेतली. कानडीतील सगळे डायलॉग मराठीत लिहून मग ते पाठांतर करणं हे जणू दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेचा अभ्यास करण्यासारखंच होतं. पण हे शिकणं एक गंमत होती असं मी म्हणेन. हा चित्रपट, यांतील भूमिका माझ्या सगळ्या आजवरच्या भूमिकांपेक्षा खूप खास आहे. नकारात्मक नाही म्हणू शकणार पण बंडखोर मताची भूमिका मी आजवर केलेली नाही. त्यामुळे हा वेगळाच अनुभव आहे".

# ठेकेदारांवर उपासमारीची वेळ; मंत्री अशोक उईके यांच्या मनमानीवर ठेकेदार संतप्त!

- आदिवासी विकास विभागाकडून रस्ते कामांचा निधी थांबला

**(समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) ठेकेदारांवर सध्या आर्थिक संकट ओढावले आहे. राज्यातील विविध विभागांमध्ये काम करणाऱ्या ठेकेदारांची कोट्यवधी रुपयांची बिले शासनाकडे थकलेली आहेत. विशेष म्हणजे, आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून केली जाणारी रस्ते कामे गेल्या मार्च महिन्यापासून पूर्णपणे ठप्प झाली असून, या कामांसाठी एक रुपयाही निधी दिलेला नाही, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. सदर विभागाचे मंत्री मा. अशोक उईके यांच्या हेकेखोर व मनमानी वर्तनामुळे ठेकेदारांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप संबंधित कंत्राटदारांनी केला आहे. ठेकेदारांनी मंत्री उईके यांना थकबाकीबाबत भेटण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी अतिशय उर्मट आणि अपमानास्पद भाषेत उत्तर दिले, असा ठेकेदारांचा आरोप आहे. राज्य शासनाने आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून रस्ते बांधकाम, दुरुस्ती व विकासकामांसाठी कोट्यवधी रुपयांची मान्यता दिली होती. अनेक ठिकाणी ही कामे पूर्णत्वास गेली असून ठेकेदारांनी आपले सर्व श्रम आणि भांडवल गुंतवले आहे. मात्र, गेल्या मार्चपासून या कामांसाठी एक रुपयाचाही निधी दिला गेलेला नाही. परिणामी, ठेकेदारांवर उपासमारीची वेळ आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने नुकताच ०४-०३ दुरुस्ती निधी वितरित करून ठेकेदारांना काही प्रमाणात दिलासा दिला. पण, त्याच वेळी आदिवासी विकास विभागाकडे तरतूद असूनही निधी थांबविण्यात आला आहे. त्यामुळे, मंत्री अशोक उईके हे जाणूनबुजून मनमानी करत आहेत का, असा प्रश्न ठेकेदार वर्तुळात उपस्थित केला जात आहे.

दिवाळीच्या सणाच्या काळात ठेकेदारांच्या घरात मात्र निराशेचे वातावरण होते. अनेक ठेकेदार कर्जबाजारी झाले असून, बँका व पुरवठादारांकडून दडपण येऊ लागले आहे. काही ठेकेदारांनी “गेल्या वर्षभरात एक रुपयाही मिळाला नाही” असे सांगितले. काही जण तर आत्महत्येच्या विचारांपर्यंत पोहोचल्याचे गंभीर संकेत मिळत आहेत. मागे कामाचे बिल न मिळाल्यामुळे हर्षल पाटील या सांगलीच्या कॉन्ट्रॅक्टदाराने आत्महत्या केली होती, आता आदिवासी विकास विभागात दुसऱ्या कुणी कॉन्टॅक्टदाराच्या आत्महत्येची मंत्री अशोक उईके वाट बघत आहेत का? ठेकेदार संघटनांनी आदिवासी विकास विभागाकडे तातडीने निधी मुक्त करण्याची मागणी केली आहे. “आम्ही काम पूर्ण करून शासनाचा विकास वाढविला, पण आता आमच्याच जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. मंत्री अशोक उईके यांनी मनमानी सोडून ठेकेदारांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत,” अशी ठाम भूमिका ठेकेदारांनी घेतली आहे. राज्य शासनाकडून या संदर्भात अद्याप अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. मात्र, ठेकेदारांचे आर्थिक संकट वाढत चालले असल्याने सरकारने त्वरित हस्तक्षेप करून थकबाकीची बिले मंजूर करावीत, अशी मागणी सर्वत्र होत आहे.

एकीकडे ठेकेदार हवालदिल झाले आहेत तर अशोक उईके आदिवासी विकास मंत्री त्यांच्या भावनानशी खेळण्याच्या प्रयत्न करत आहेत गेले एक वर्षापासून एक रुपया पण मिळाला नसल्याने आत्महत्येचे विचार ठेकेदाराचा मनात येत आहेत

महाराष्ट्र सरकारने आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांच्या कामासाठी मान्यता दिल्या मात्र आता काम पूर्ण असतानाही पैसे द्यायला टाळाटाळ करत आहेत असा आरोप कंत्राटदार मंडळी करत आहेत.

## चोरांनी मारला मौल्यवान दागिन्यांवर डल्ला..!

**संगमनेर तालुका : (समर्थ गांवकरी)**



संगमनेर तालुक्यातील निमगाव भोजापूर येथील जागृत देवस्थान असलेल्या चतुःश्रृंगी माता मंदिरात चोरांनी देवीच्या गळ्यातील मौल्यवान दागिन्यांवर डल्ला मारल्याची घटना उघडकीस आली. सकाळी सकाळी मंदिरात देवीच्या दर्शनासाठी आलेल्या दोघा युवकांनी मंदिरात आणि आजुबाजूला कोणी नसल्याचे लक्षात येताच देवीच्या गळ्यात असणारे मौल्यवान सोने चांदीचे दागिने घेऊन तेथून पळ काढला ही घटना गावकऱ्यांच्या लक्षात आल्याने गावकऱ्यांनी मंदिरात असलेले सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यात दोन चोर चोरी करताना स्पष्ट दिसत असल्याने तातडीने घटनेची माहिती तालुका पोलिसांना कळविली., पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून माहिती घेत चोरांचा लवकरच तपास करण्याचे सांगीतले.

## गावठी कट्टा बाळगणाऱ्या एकाला पोलीसांनी ठोकल्या बेड्या

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



बेकायदेशीर कट्टा बाळगल्या प्रकरणी खोडद येथील एकाला गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने अटक केली.अटक केलेल्या व्यक्तीचे नाव जितेंद्र रोहीदास पानमंद रा:-पानमंद मळा खोडद ता:- जुन्नर जि:-पुणे असे आहे.राज्यातील आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती, नगरपरिषद निवडणुकांच्या अनुषंगाने पुणे ग्रामीण जिल्ह्या मध्ये अग्नीशस्त्रे संबंधी कारवाई करण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक संदीप गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला दिल्या होत्या. त्यानुसार बुधवारी दि:- १२ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जुन्नर विभागात पेट्रोलिंग करत असताना सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांना एका गोपनीय बातमीदारामार्फत खबर मिळाली की नारायणगाव पोलिस स्टेशन हद्दीतील खोडद येथील जितेंद्र रोहीदास पानमंद रा:- पानमंद मळा खोडद हा जे.एम.आर.टी चौक खोडद येथे उभा असून त्याच्या ताब्यात बेकायदेशीर गावठी कट्टा आहे. मिळालेल्या गुप्त माहितीनुसार गुन्हे शाखेच्या पथकानेपंचासमक्ष त्या ठिकाणी सापळा रचून जितेंद्र पानमंद याला ताब्यात घेतले व त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला लपविलेला एक गावठी कट्टा सापडला हा गावठी कट्टा जप्त केला असून त्याबाबत नारायणगाव पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान या आरोपीची वैद्यकीय तपासणी करून नारायणगाव पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. ही कार्यवाही ही पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदिप गिल्ल,अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शना खाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अविनाश शिळीमकर साहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार,दीपक साबळे,संदीप वारे.,राजु मोमीन, अक्षय नवले आदींनी केली आहे.







# दै. स. गांवकरी दिवाळी अंकाचे बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते प्रकाशन

**दैनिक समर्थ गांवकरी वृत्तपत्र म्हणजे ग्रामीण पत्रकारितेचा उत्सव आणि समाजभानाचे प्रतिबिंब!**

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**




ग्रामीण जनतेचा आवाज ठरणाऱ्या दैनिक समर्थ गांवकरी या वृत्तपत्राच्या दिवाळी अंकाचा भव्य प्रकाशन सोहळा संगमनेर येथे अत्यंत उत्साही व अभिमानास्पद वातावरणात संपन्न झाला. महाराष्ट्र राज्याचे माजी महसूलमंत्री, कॉंग्रेस पक्षाचे वर्किंग कमिटी मेंबर तसेच ज्येष्ठ नेते नामदार माननीय श्री. बाळासाहेब थोरात यांच्या शुभहस्ते या अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमास दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री. राजू पाटील, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक श्री. संजय फुलसुंदर, सेवानिवृत्त सैनिक नामदेव लोखंडे, अशोक पाटील, संतोष स्वामी व मधुकर भोर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रकाशना नंतर बोलताना थोरात साहेबांनी ग्रामीण पत्रकारितेचे समाजातील महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, “दैनिक समर्थ गांवकरी” हे ग्रामीण भागातील प्रश्नांना न्याय देणारे, दुर्लक्षित वर्गाचा आवाज बनलेले आणि लोकशाही बळकट करणारे माध्यम आहे. आजच्या काळात अशा निर्भीड आणि बांधिलकीच्या पत्रकारितेची गरज समाजाला आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

तसेच त्यांनी डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या पत्रकारितेतील निष्ठा, नेतृत्व आणि सातत्यपूर्ण सामाजिक भानाचे विशेष कौतुक केले. “दैनिक समर्थ गांवकरी” हे केवळ वृत्तपत्र नसून ते ग्रामीण भारताचा आत्मा, संस्कृती आणि संघर्ष दाखवणारे सशक्त व्यासपीठ आहे, असे थोरात साहेबांनी नमूद केले.

या प्रसंगी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, “दिवाळी अंक हा केवळ साहित्यिक सृजनाचा मंच नाही, तर तो ग्रामीण समाजजीवनाचे दर्शन घडवतो. समर्थ गांवकरीच्या माध्यमातून आम्ही ग्रामीण भागातील विकास, शैक्षणिक प्रगती, सामाजिक प्रश्न आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वे समाजापर्यंत पोहोचवण्याचा सातत्यपूर्ण प्रयत्न करीत आहोत.”

श्री. राजू पाटील यांनी या अंकाच्या संपादकीय गुणवत्तेचे कौतुक करत सांगितले की, ग्रामीण पत्रकारांनी जिद्दीने केलेले काम राज्यातील पत्रकारितेला नवीन दिशा देत आहे. श्री. संजय फुलसुंदर यांनी दिवाळी अंकाची निर्मिती प्रक्रिया व संपादकीय टीमच्या योगदानाबद्दल माहिती दिली, तर संतोष स्वामी यांनी आकर्षक सूत्रसंचालन करत कार्यक्रमाचे वातावरण उत्साही ठेवले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संजय फुलसुंदर यांनी मान्यवरांचे आभार मानून केले.

या प्रकाशन सोहळ्याला संगमनेर परिसरातील अनेक पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यप्रेमी, वाचकवर्ग आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांच्या चेहऱ्यावर अभिमान व समाधान स्पष्ट दिसत होते. दैनिक समर्थ गांवकरी दिवाळी अंक हा ग्रामीण समाजजीवन, संस्कृती, लोककला, साहित्य आणि जनतेच्या संघर्षाचे प्रतिबिंब ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

स्वामी विवेकानंद विचार मंच विद्यालयाच्या माजी

# विद्यार्थी संघटनेकडून 20 गरीब विद्यार्थिनींना सायकल वाटप

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

पुष्पावती विद्यालय ,डिंगोरे येथे 'स्वामी विवेकानंद विचार मंच' या विद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे गरीब व गरजू २० विद्यार्थिनींना सायकल बँक स्थापन करून सायकलींचे वितरण व सात स्वच्छतागृह युनिटचे हस्तांतरण करण्यात आले .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती परितोषिक विजेते ,निवृत्त कस्टम अधिकारी आणि मुक्तादेवी मंडळाचे अध्यक्ष सुनील आमले होते .यावेळी जिल्हा परिषद माजी सदस्य अंकुश आमले ,ग्रामविकास मंडळाचे उपाध्यक्ष प्रभाकर तांबे ,खजिनदार रघुनाथ तांबे ,सचिव प्रदीप गाढवे ,सहसचिव पंकज घोलप ,माजी जिल्हा परिषद सदस्य बबन तांबे ,उपसरपंच निलेश लोहोटे ,लक्ष्मण लोहोटे ,संदीप शिंगोटे ,तंटामुक्ती अध्यक्ष राजेंद्र सुकाळे ,पांडुरंग लोहोटे ,अहीलूनाना लोहोटे ,रवींद्र खरात ,अमित बनकर ,जालिंदर उकिरडे ,निलेश आमले ,राहुल शेरकर ,बाळकृष्ण खरात , दीपक उकिरडे आदि मान्यवर उपस्थित होते .



अध्यक्षीय भाषणात सुनील आमले यांनी सांगितले की, "सायकल ही केवळ प्रवासाचे साधन नसून शिक्षणाच्या दिशेने टाकलेले प्रेरणादायी पाऊल आहे". तसेच अंकुश आमले यांनी म्हटले," स्वामी विवेकानंद विचार मंचाचे कार्य हे समाजातील परिवर्तनाचे आणि नव चैतन्याचे प्रतीक आहे." डिंगोरे ग्रामपंचायतीच्या सरपंच सीमा सोनवणे यांनी विद्यालयाच्या नवीन इमारतसाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले.

प्रास्ताविक मुख्याध्यापक शरद माळवे यांनी केले तर जगन्नाथ गाढवे यांनी आभार मानले.




मनपा सिडको मालमत्ता धारकांशी २१ नोव्हेंबर रोजी एक दिवसासाठी मालमत्ता व पाणी पट्टी थकबाकी करावर ८० टक्के सुट. नवीन नांदेड -नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २१ नोव्हेंबर रोजी एक दिवसासाठी मालमत्ता कर व पाणीपट्टी करात ८० टक्के सुट देण्यात येणार असुन मालमत्ता धारकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन क्षेत्रीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग व कार्यालय अधीक्षक विलास गजभारे यांनी केले आहे.

## थोडक्यात बातम्या...

### आ. संग्राम जगताप यांच्यावर निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती



अहिल्यानगर (स. गांवकरी) : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी पक्षाचे जेष्ठ आमदार संग्राम जगताप यांची अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यातील "निवडणूक प्रभारी" म्हणून नियुक्ती केली आहे. या नियुक्तीबाबत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अधिकृत पत्र जारी केले आहे. येत्या काळात नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी आणि निवडणुकीच्या तयारीस गती देण्यासाठी ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. पत्रात म्हटले आहे की, नुकत्याच नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाली आहे. या निवडणुकांच्या दृष्टीने योग्य नियोजन करून पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे समन्वय राखण्यासाठी संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. या नियुक्तीमुळे अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नवचैतन्य लाभेल, असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. संग्राम जगताप यांच्या या नियुक्तीबद्दल जिल्ह्यातील कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी निवडणुकांमध्ये पक्षाच्या विजयासाठी ते निर्णायक भूमिका निभावतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### निवडणुकीसाठी भाजपाच्या स्टार प्रचाराकांची यादी जाहीर

अहिल्यानगर (स. गांवकरी) : निवडणूक आयोगाकडून राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. जाहीर करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार राज्यात दोन डिसेंबरला नगर पंचायत आणि नगर परिषद निवडणुकीसाठी मतदान होणार आहे, तर तीन डिसेंबरला निवडणुकीची मतमोजणी आहे. दरम्यान या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आता राजकीय घडामोडींना वेग आला असून, सर्वच पक्षांनी प्रचाराला जोरदार सुरुवात केली आहे. भाजपकडून आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे. ज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक नेत्यांचा समावेश आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपानं आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. ज्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे, विनोद तावडे, पीयूष गोयल, नारायण राणे, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, रावसाहेब दानवे, आशिष शेलार, मुलरलीधर मोहोळ, राधाकृष्ण विखे पाटील, पंकजा मुंडे, गिरीश महाजन, गणेश नाईक, जयकुमार रावल, शिवेंद्रराजे भोसले या नेत्यांचा समावेश आहे. दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार राज्यात काही ठिकाणी भाजप ही निवडणूक महायुतीमध्ये लढणार आहे, तर काही ठिकाणी निवडणूक स्वबळावर लढवली जाणार आहे. सध्याचं राजकीय वतावरण पहाता सर्व पक्षांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे, कारण यानंतर आता लगेच महापालिकांच्या निवडणूका होणार आहेत. तसेच विधानसभा निवडणुकीमध्ये राज्यात महायुतीला मोठं यश मिळालं होतं, त्यानंतर ही पहिलीच निवडणूक असल्यामुळे मतदार कोणाच्या बाजुने कौल देणार हे देखील पहाणं महत्त्वाचं ठरणार आहे.

### लहुजी साळवे यांच्या जयंतीचे १४ नोव्हेंबर रोजी संगमवाडी येथे नियोजन




नारायणगाव (स. गांवकरी) : आद्यगुरु लहुजी वस्ताद साळवे ट्रस्ट, आद्यगुरु लहुजी साळवे स्मारक शासन समिती महाराष्ट्र राज्य, आणि पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथील संगमवाडी येथे क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या 231 व्या जयंतीचे भव्य नियोजन करण्यात आले आहे अशी माहिती आद्यगुरु लहुजी साळवे स्मारक शासन समितीचे अध्यक्ष अशोकराव लोखंडे व उपाध्यक्ष शिवाजीराजे राजगुरू यांनी दिली. या जयंती सोहळ्याच्या निमित्ताने महागायक श्री चंदनभाऊ कांबळे गायनाचा कार्यक्रम दुपारी 2 वाजता आयोजित केला आहे. सालाबाद वर्षाप्रमाणे क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या 231 व्या 14 नोव्हेंबर जयंती रोजी पुण्यातील संगमवाडी येथील लहुजी समाधीस्थळी महाराष्ट्रातून सर्व लहुजी अनुयायी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून अभिवादन करतात.दर वर्षी प्रमाणे लहुजींना अभिवादन करण्यासाठी यावे. ही . क्रांतीगुरु लहुजी साळवे राष्ट्रीय स्मारक शासश समिती व पुणे महापालिकेच्यावतीने आपणास विनंती करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील बहुजन समाजासाठी विशेषतः मातंग समाजासाठी क्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे यांचे समाधीस्थळ लाखोंच्या संख्येने एकत्र येण्यासाठी एकमेव असे स्फुर्तीस्थळ आहे. छत्रपती.शिवराय यांच्या जयंती दिनी शिवनेरी येथिल जन्मस्थळी व रायगड येथिल समाधीस्थळी तसेच *राजमाता जिजाऊ यांच्या बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्रातून लाखो मराठा समाज बांधव उपस्थित राहतात. त्याचप्रमाणे १४ एप्रिलला दीक्षाभूमीवर, ६ डिसेंबरला चैत्यभूमीवर लाखो बौद्ध बांधव बहुजन आज *डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी जातात.

# बुरूडगाव रोड व विनायकनगर परीसरात चोरीच्या घटनाबाबत नागरिकांचे पोलिस अधिक्षकांना निवेदन

## पोलिस चौकी स्थापन करण्याची मागणी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

बुरूडगाव रोड व विनायकनगर या विकसित परीसरात वारंवार होणाऱ्या चोरी,चैन स्नॅचिंग, घरफोडीच्या घटना वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या संदर्भात प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांच्यासह नागरिकांनी पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन देउन गुन्हयांवर आळा घालावा आणि परीसरात स्वतंत्र पोलिस चौकी स्थापन करावी, अशी मागणी केली. यावेळी प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, ॲड. अवधूत फुलसौंदर, पांडुरंग धोत्रे, सुनिल कोल्हे आदी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की गेल्या तीन ते चार महिन्यांपासून बुरूडगाव रोड व विनायकनगर या परीसरात चैन स्नॅचिंग,चोऱ्या, घरफोडी घटना वाढल्याने परीसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे या परीसरात शहरातील अनेक व्यापारी,नोकरदार राहात असून




सदर भागात गेल्या महिन्यात पांडुरंग धोत्रे, सुनिल कोल्हे, श्रीमती सरोजीनी कटारीया यांच्याकडे चोरी होउन मोठया प्रमाणात रोकड व ३५ तोळे सोने असा ऐवज चोरी झालेला आहे. ज्या घरातील नागरिक बाहेर गावी गेलेले असतात तेच घरे,बंगले फोडले जातात.एकाही चोरीचा अदयाप तपास लागलेला नसून नागरिक चिंताग्रस्त झालेले आहे या घटनामुळे नागरिकांत असुरक्षिततेची भावना वाढत असून आपण वैयक्तिक लक्ष घालून सदर प्रकरणी तपास लावून गुन्हेगारांना जरब बसवावी त्यामुळे या परीसरात पोलीस चौकी लवकरात लवकर सुरू करावी अन्यथा परीसरातील नागरिकांसह आंदोलन करण्यात येईल.

# अपहार प्रकरणातील अहवाल सादर करण्याचे आदेश

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

महापालिकेच्या आरोग्य विभागातील साडेसोळा लाखांच्या अपहार प्रकरणी दाखल गुन्ह्यात अधिक तपास करून ९ फेब्रुवारी २०२६ पूर्वी अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हा न्यायालयाने कोतवाली पोलिसांना दिले आहेत. कोतवाली पोलिसांनी या गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल करताना वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांचे नाव वगळण्याचा अहवाल दिला होता. मात्र, या गुन्ह्यात अपूर्ण व सदोष तपास झाल्याचा आक्षेप फिर्यादी डॉ. सतीश राजूरकर यांनी घेत अधिक तपासाची मागणी केली होती, ती न्यायालयाने मान्य केल्याचे ॲड. अभिजीत पुप्पाल यांनी सांगितले. आरोग्य विभागातील अपहार प्रकरणी राष्ट्रीय आरोग्य अभियानचे शहर लेखा व्यवस्थापक विजयकुमार महादेव रणदिवे व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासात पोलिसांना गुन्ह्यात डॉ. बोरगे यांचा सहभाग आढळून आला नाही. डॉ. बोरगे यांच्यावर आरोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावा नाही, असा अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला होता.

# उपसरपंचपदी जान्हवी मोरे यांची बिनविरोध निवड

**कळवण : (समर्थ गांवकरी)**

कळवणच्या ओतूर ग्रामपंचायतीच्या उप सरपंच पदी बिनविरोध निवड नव्या नेतृत्वाकडून ग्रामविकासाची नवी दिशा.कळवण (ता. नाशिक) : स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकशाहीचा उत्सव म्हणावा अशी घटना ओतूर ग्रामपंचायतीत घडली. ओतूर ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदाच्या निवडणुकीत के. निंबाजी मोतीराम पाटील यांच्या सुनबाई आणि ग्रामपंचायतीतील विद्यमान सदस्य श्रीमती जान्हवी युवराज मोरे यांची उप सरपंच पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून ग्रामपंचायतीत सत्तेच्या



फेरबदलाची चर्चा जोरदार सुरु होती. माजी उपसरपंच दिपक माळी यांनी रोटेशन प्रमाणे आपल्या पदाचा दिला व राजीनाम्यानंतर ही निवड आवश्यक झाली होती. ग्रामस्थ, सदस्य आणि स्थानिक नेतृत्व यांच्या एकमताने श्रीमती जान्हवी मोरे यांच्या नावाला पसंती देत एकमताने निर्णय घेण्यात आला.ओतूर गावात या निवडणुकीचा माहोल उत्सवाच्या जल्लोषात रंगला होता. ग्रामपंचायतीच्या आवारात महिला-पुरुष, तरुण, वयोवृद्ध सर्वजण उपस्थित होते. "महिला नेतृत्वाला ग्रामविकासाची धुरा देण्याचा निर्णय हा ओतूर गावाचा प्रगतीचा नवा टप्पा ठरेल," असे अनेक ग्रामस्थांनी सांगितले. ग्रामपंचायतीत विकासकामांमध्ये गती असलेल्यांच्या भावना लोकांत होती. आता नव्या उपसरपंचाकडून सर्वसामान्य नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. गावातील पायाभूत सुविधा, महिला सक्षमीकरण, स्वच्छता आणि रोजगार निर्मिती या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज आहे, असे ग्रामस्थांनी मत व्यक्त केले.या निवडणुकीवेळी ग्रामविकास अधिकारी सुनील आहेर यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले, तर अध्यक्षस्थान सरपंच पार्वता गांगुर्डे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. या प्रसंगी ओतूर गावातील कार्यकर्ते उपस्थित होते.

# किल्ले बनवा स्पर्धेत अनुप घंगाळे आणि पियुष गुंजाळ प्रथम

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

राजुरी (ता. जुन्नर) येथील विद्या विकास मंदिर या शाळेत किल्ले बनवा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे 7500 रुपयांचे बक्षीस अनुप घंगाळे (सिंहगड किल्ला ) आणि पियुष गुंजाळ (शिवनेरी किल्ला )यांनी पटकावले.

तर द्वितीय क्रमांकाचे 6500 रुपयांचे बक्षीस सुयोग ग्रुप (प्रतापगड किल्ला) आणि पृथ्वीराज औटी (जंजिरा किल्ला) यांनी मिळवले. तृतीय क्रमांक चे 5500 रुपयांचे बक्षीस



तन्वी कणसे (जंजिरा किल्ला) आणि आयुष हाडवळे (पद्मदुर्ग किल्ला) यांनी पटकावले.

चतुर्थ 4500 रुपयांचे बक्षीस साहिल लेंडे (शिवनेरी किल्ला )आणि कुणाल दुधवडे (अजिंक्यतारा किल्ला) यांनी मिळवले.पाचव्या क्रमांकाचे 3500 रुपयांचे बक्षीस सिद्धेश हाडवळे साई हाडवळे (प्रतापगड किल्ला) आणि कुणाल हाडवळे (लोहगड किल्ला) यांना देण्यात आले.

यावेळी उपसरपंच माऊली शेळके, शरदचंद्र पतसंस्थेचे अध्यक्ष एम.डी घंगाळे, ज्ञानेश्वर गटकळ, गणेश सहकारी दूध संस्थेचे उपाध्यक्ष दिलीप घंगाळे, विक्रम डुंबरे, गंगाराम औटी,साईनाथ हाडवळे,निलेश हाडवळे,सचिन जाधव, माऊली घंगाळे उपस्थित होते.

# माजी विद्यार्थी मेळावा संपन्न

**खोडद : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील सुराळे गावात सह्यसखा फाउंडेशन पुणे आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुराळे यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बचत गटांचा पाककृती मेळावा, शाळेतील माजी विद्यार्थी मेळावा तसेच मुख्याध्यापक खंडेराव ढोबळे यांची बदली झाल्याने त्यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारताच्या इस्रो व डीआरडीओ संस्थेचे शास्त्रज्ञ टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांचे जवळचे सहकारी चांद्रयान मोहिमेत सहभाग असणारे जेष्ठ गणित तज्ञ डॉ. दिलीप देशमुख यांनी भूषविले. सूत्रसंचालन शिक्षक सुनील डोळस यांनी केले तर मुख्याध्यापक पंढरीनाथ उतळे यांनी आभार मानले.



# सर्वसामान्यांसाठी चांगला कारभार होईल : मुख्यमंत्री फडणवीस

**नाशिक: (समर्थ गांवकरी)**

नाशिक जिल्हा परिषदेची इमारत राज्यातील सर्वात मोठी आणि सुंदर इमारत आहे. या इमारतीतून सर्वसामान्यांसाठी अतिशय चांगला आणि गतिमान कारभार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

नाशिक - त्र्यंबकेश्वर रोडवरील एबीबी सर्कलजवळ उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद नूतन प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री अ‍ॅड. माणिकराव



कोकाटे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार डॉ. शोभा बच्छाव, खासदार भास्कर भगरे, खासदार राजाभाऊ वाजे, आमदार सुहास कांदे, आमदार मुफ्ती मोहम्मद इस्माईल, आमदार दिलीप बोरसे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार दिलीप बनकर, आमदार राहुल ढिकले, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, राज्यातील जिल्हा परिषदांच्या इमारतीपैकी सर्वात सुंदर अशी ही इमारत झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मंत्री, लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे अधिकारी, पदाधिकारी यांचे अभिनंदन केले पाहिजे. सुसज्ज सुविधांसह असलेली ही इमारत जनसामान्य व्यक्तींना सुविधा निर्माण करणारी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्यासह मान्यवरांनी इमारतीची पाहणी केली.

सुरुवातीला मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी फीत कापून आणि कोनशिलेचे अनावरण करून जिल्हा परिषद इमारतीचे उद्घाटन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मान्यवरांचे स्वागत केले.

कार्यक्रमाला मान्यवरांसह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व पदाधिकारी, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार आदी उपस्थित होते.

त्र्यंबकेश्वर रोडवरील एबीबी सर्कलजवळ उभारण्यात आलेली जिल्हा परिषद नाशिकची नूतन प्रशासकीय इमारत इमारत जिल्हा परिषदेच्या प्रगतिशील दृष्टिकोनाचे प्रतिक आहे. शाश्वत विकास, ऊर्जा बचत, सुरक्षा आणि सोयी या सर्व बाबींचा विचार करून बांधकाम करण्यात आले आहे.

ऊर्जासक्षम बांधकाम, पुरेसा नैसर्गिक प्रकाश व खेळती हवा, तसेच छतावर सोलर सिस्टीम बसविल्यामुळे वीज खर्च शून्याच्या जवळ जाणार आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे जलसंवर्धन आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना देण्यात आली आहे.

इमारतीत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी अध्ययन, संशोधन आणि संदर्भासाठी सुविधा आहे. महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र, सुरक्षित व आरामदायी विश्रांतीगृह तयार करण्यात आले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अ‍ॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# नांदेड तहसीलच्या पथकाची पुन्हा वाळू माफियावर जबर कारवाई



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड तहसीलदार यांच्या पथकाने गस्ती वर असताना नांदेड तालुक्यातील वाहेगाव गोदावरी नदीच्या पात्रात १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ५ वाजता अवैध रित्या वाळू उत्खनन करणारे ४ इंजिन व २० तराफे जिलेटीनचा सहायाने नष्ट करण्यात आले असून जवळपास २४ लाखांचा माल जागेवरच नष्ट करण्यात आला असून या कार्यवाही मुळे अवैध रित्या वाळू उपसा करणाऱ्यात खळबळ उडाली आहे.

नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या व उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार संजय वारकड,नायब तहसीलदार संजय नागमवाड,सुनील माचेवाड ,मंडळ अधिकारी मोहसीन सय्यद ,कुणाल जगताप अनिरुद्ध जोंधळे ग्राम महसूल अधिकारी मनोज जाधव,बरोडा ,श्रीरामे ,जमदाडे, मनोज सरपे,महेश जोशी,गिरी, मुंगल, जमदाडे,सकवान,महसूल सेवक बालाजी सोनटक्के महसूल पथक वाहेगाव परिसरामध्ये पहाटे ५ वाजता अवैध रेती उत्खनन प्रतिबंधासाठी गस्तीवर असताना रेती उत्खनन करणारे ४ इंजिन आढळून आले.

पथकाने मजुरांच्या साह्याने ४ इंजिन जिलेटीने स्फोट करून नष्ट केले. २० तराफे जाळून नष्ट करण्यात आले,असे एकूण जवळपास २४ लाख किमतीचा मुद्देमाल जाग्यावरच स्फोट करून व तराफे जाळून नष्ट करण्यात आले . बेकायदेशीर वाळू वाहतूक केल्यास याही पेक्षा कडक कारवाई करून संबंधितावर गुन्हा दाखल करून वेळप्रसंगी एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येईल असा इशारा नांदेड तहसीलदार संजय वारकड यांनी दिला आहे.



नांदेड जिल्हा : संस्थेत नजीकच्या काळात परीक्षा सुरु होत आहेत. परीक्षेच्या काळात बरेच विद्यार्थी परीक्षेचा ताण घेत असतात याचा विचार करून संचालक डॉ. मनेश कोकरे यांचे मार्गदर्शनाखाली रेक्टर डॉ.सावरकर सर व वसतीगृह वार्डन यांनी एस.जी.जी.एस. संस्थेतील देवगिरी, नंदगिरी आणि गोदावरी वसतिगृहातील निवासी विद्यार्थिनींसाठी ८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता कृष्णा मेस रिक्रिएशन हॉलमध्ये एक दिवसीय, मार्गदर्शन वर्ग/चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या मार्गदर्शन वर्गात/चर्चासत्रात दोन महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थीनीना मार्गदर्शन करण्यात आले, ज्यात "परीक्षेचा ताण व्यवस्थापन" आणि "वसतिगृह स्वच्छता" या विषयांचा समावेश होता.

## थोडक्यात बातम्या...

### झापवाडी येथे बिबट्याचा तरुणावर हल्ला



**खोडद (स. गांवकरी) :** जुन्नर तालुक्यातील झापवाडी येथे मंगळवार दि .११ नोव्हेंबर रोजी किरण अनाजी शेळके (वय २२ ) हा तरुण शेतातून घरी जात असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्याच्या दुचाकीवर झेप घेतली .यावेळी बिबट्याने या तरुणाच्या डाव्या पायाला पंजाने ओरखडले . पंजा पॅन्ट मध्ये अडकल्यामुळे पॅन्ट फाटली आणि तो शेजारच्या शेतात पडला .यामुळे त्याच्या गुडघ्याला मार लागला .घाबरलेल्या अवस्थेत या तरुणाने घरी फोन करून या घटनेची कल्पना दिली.घटनास्थळी तात्काळ घरचे सदस्य येऊन त्यांनी जखमी तरुणाला बेल्हा येथील खाजगी दवाखान्यात दाखल केले. या परिसरात बिबट्याच्या अशा घटना वारंवार घडत असून भीतीचे वातावरण नागरिकांमध्ये पसरले आहे.

### जळगाव जिल्ह्यात थांडीचा जोर वाढल्याने भरीताच्या वांग्यांची मागणी वाढली



**रावेर (स. गांवकरी) :** राज्यभरात जळगाव जिल्ह्यात तपमानाचा पारा घसरून , ९ / २ अंशावर आल्याने प्रसिद्ध असलेल्या खांदेशातील भरीताच्या वांग्यांची मागणी वाढली आहे. विषेश बामणोद ता यावल येथिल वांग्यांना भरीत खवैयांची जास्त पसंतीसह मागणी वाढली आहे. यावल , भुसावल, मुक्ताई नगर , सह रावेर तालुक्यातही वांग्यांचे उत्पादन घेतले जाते. या भागात डिसेंबर जानेवारी महिण्यात खाजगी खवैये भरीताचा अस्वाद घेतातच परंतु बहुतेक ठिकाणी मोठ मोठ्या पार्थ्यांचेही आयोजन करण्यात येते. या पार्ट्यांसाठी नोकरी निमित्त पुण्या , मुंबईला गेलेले चाकरमानी गावाकडे येत असतात . मात्र कायम मे महिण्या पासून दर आठवड्याला पावसाची आवक सुरूच असल्याने उत्पादनात २५ टक्यांनी घट झाली असल्याचे वांगी उत्पादक शेतकऱ्यात बोलले जात आहे. वांगे बियांण्याच्या अनेक संकरीत व पारंपारिक जाती असल्या तरी एकाच जातीचे बियाणे या भागामध्ये घेतले जाते . त्याच बरोबर ढोबळी मिरची सारखीच दिसणारी परंतु थोडी लांब असलेल्या मिरचिही लागवड भरीतासोबत चाखायला लावली जाते . आवक कमी , परंतु मागणी वाढल्याने ५० ते१०० रुपयापर्यंत भरीताच्या वाग्यांचे भाव आजरोजी खवैयांना भोजावे लागत आहेत. त्याच बरोबर इतर जिल्ह्यातील पाली हाऊसवर उत्पादीत केलेल्या भाव कमी असला तरी या भागात या वांग्याना फारच कमी असते. पुण्या मुंबईलाच या वाग्यांना पाठवण्यात येत असल्याचे सांगण्यात येते. राज्यभरात थंडीला मोठया प्रमाणात सुरुवात झाली आहे. रब्बीच्या पिकांना याची अवश्कता असून , यांचा फायदा भरघोस उत्पादनात होतो शेतकऱ्यां मध्ये बोलले जात असले तरी भरीत खवैयांची मात्र चंगळ सुरू आहे.

### दिव्यात भर दिवसा तरुणावर चॉपरने जीवघेणा हल्ला



**ठाणे, दिवा (स. गांवकरी) :** दिव्यात भर दिवसा तरुणावर चॉपरने जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली असून दोन्हीही आरोपीना दिवा पोलिसानी ताब्यात घेतले आहे. दिवा शहरातील गजबजलेल्या अशा मुंब्रादेवी कॉलनी परिसरात भर दुपारी विनीत वाल्मिकी व प्रमोद प्रजापती यांनी अभिषेक पांडे या २६ वर्षीय तरुणावर चॉपरने वार करत गंभीर जखमी केले आहे. सदर गंभीर जखमी तरुणावर कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचार सुरु आहेत सदर आरोपीना स्थानिक रहिवाशीयांनी पोलिसांच्या ताब्यात दिले. घटनेचे गांभीर्य ओळखून मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलिसांनी आरोपीनां अटक करून गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु असून तपास सुरु करण्यात आला आहे. भर दिवसा असे हल्ले होत असतील तर कायदा सुव्यवस्था धोक्यात असून दिव्यातील गुंडगिरी पोलिसांनी मोडीत काढावी व दिवा शहरात अल्पवयीन मुले गुन्हेगारीकडे वळत आहेत गल्लोगल्ली मध्ये हे चित्र पाहायला मिळते. छोट्या छोट्या कारणांवरून अल्पवयीन मुल भाईगिरी करत वातावरण दूषित करण्याचा प्रयत्न करत असून दिवा पोलिसांनी या सर्वांची कसुन चौकशी करून यांच्या मागे कोण दादा, भाई आहे यांच्यावर पण कारवाई केली पाहिजे असे काही ज्येष्ठ नागरिक व महिलानी यावेळी बोलताना स्पष्ट केल आहे.

### उत्कृष्टतेकडे वाटचाल छोट्या सवयींपासूनच सुरू होते - राहुल द्रविड



**पुणे (स. गांवकरी) :** "खेळात विजय मिळवायचा असेल, तर त्याची सुरुवात ही दैनंदिन सवयींपासूनच होते. जसे की, तोंडाचे आरोग्य राखणे ही एक छोटी वाटणारी, पण फार महत्त्वाची सवय आहे," असे मत माजी क्रिकेटपटू आणि भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी व्यक्त केले. 'ब्रेकफास्ट विथ चॅम्पियन्स' या कार्यक्रमाच्या नुकत्याच झालेल्या भागात द्रविड यांनी खेळाडूंच्या सर्वोत्तम कामगिरीत मौखिक आरोग्याची भूमिका अधोरेखित केली. त्यांनी सांगितले की, स्पर्धात्मक खेळांमध्ये आज "सर्वात छोट्या गोष्टींकडे लक्ष देणे" हे यशाचे खरे गमक ठरत आहे. "उत्कृष्टता साध्य करायची असेल, तर खेळाडूच्या केवळ शारीरिक क्षमतेकडे पाहून चालणार नाही. त्याच्या एकूण आरोग्यात, विशेषतः तोंडाच्या स्वच्छतेत मोठा फरक पडतो. आज स्पर्धात्मक खेळ हे एका टक्क्याच्या फरकावर ठरतात, आणि त्या एका टक्क्यात मौखिक आरोग्याचाही वाटा आहे," असे द्रविड म्हणाले.

# शेकडो समर्थकांसह दत्तात्रय वारे यांचा भाजपात प्रवेश; मुंबई येथे पार पडला सोहळा

- जामखेड तालुक्यात राजकीय भुकंप
- माजी सभापती व माजी जि. प. सदस्य



**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

निवडणुकीच्या तोंडावर हा पक्षप्रवेश होत असताना केवळ ६२२ मतांच्या फरकाने निवडून आलेले लोकप्रतिनिधी नगर परिषद निवडणूकीचा तिसरा दिवस असताना ते अजूनही तिकडे फिरकले नाहीत. विरोधकांना बोलायला कुठेही जागा राहिलेली नाही. त्यांच्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या त्या अहिल्यानगर आणि पुण्यमधे, मला वाटतं पुढच्या कालखंडात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या मुलाखती दिल्लीमध्ये होतील. दत्ता भाऊंनी काल दंड थोपटून घोषणा दिल्या की, "आपला तो आपलाच". त्यामुळे आता ही भुमिका आपल्याला पटलेली दिसत आहे. कारण शेवटी बाहेरचा माणूस कामापुरता येतो आणि काम झाल्यानंतर तोंड सुध्दा दातवत नाही. अशी जहरी टीका विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी आमदार रोहित पवार यांचे नाव न घेता केली. तसेच संपुर्ण महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. याच पार्श्वभूमीवर दत्तात्रय वारे व त्यांच्या बरोबर बरोबर प्रवेश घेतलेल्या सर्वच अनुभवी कार्यकर्त्यांच्या पक्षाला मोठा फायदा होणार आहे. असे म्हणत भाजपात प्रवेश केलेल्या सर्वांचे तोंडभरून स्वागतही केले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस (श. प.) चे माजी तालुकाध्यक्ष जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दत्तात्रय वारे यांचेसह जामखेड तालुक्यातील असंख्य कार्यकर्त्यांनी मुंबई येथील भाजप प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत काल दि. १२ नोव्हेंबर रोजी भाजपात पक्षप्रवेश केला. तसेच सेवानिवृत्त सहायक आयुक्त राजेंद्र पवार, बावी विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन सुंदरदास बिरंगळ, माजी सरपंच, कवडगावचे माजी सरपंच सखाराम भोरे, जामखेड पंचायत समितीचे माजी उपसभापती दादासाहेब रिटे, कवडगावचे सरपंच सिताराम कांबळे, दत्तात्रय वाळुंजकर, पाडळीचे माजी सरपंच विजय पवार, विद्यमान उपसरपंच बाळासाहेब पवार, रत्नापूरचे सरपंच लक्ष्मण जाधव, रत्नापूरचे उपसरपंच चंद्रकांत वारे, ग्रामपंचायत सदस्य दिलीप वारे, धानोराचे गोपीचंद काळे, माळी महासंघाचे अध्यक्ष सुनील हराळ, राष्ट्रवादी विद्यार्थी आघाडी माजी तालुका अध्यक्ष शुभम हजारे, माजी सरपंच, मतेवाडीचे माजी सरपंच कानिफ मते, रत्नापूरचे युवा नेते पै. पांडुरंग बाप्पा ढवळे, जामखेडचे बाळासाहेब नेटके, धानोराचे युवा नेते राजू शिंदे, भाऊराव काळे, अविनाश आढाव, जवळाचे दीपक मते, वैभव वाळुंजकर, वैभव साळवे, प्रवीण मते, दत्ता काळे, विकास सेवा सोसायटीचे संचालक शैलेंद्र कदम, रत्नापुरचे माजी सरपंच दत्ता कुर्लेकर, धानोराचे ग्रामपंचायत सदस्य हरिभाऊ करंडे, सरदवाडीचे श्रीराम जरांगे, रियाज शेख आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी यावेळी भाजपात प्रवेश केला. या सर्व मान्यवरांचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण व विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी यथोचित स्वागत केले. या कार्यक्रमास जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अंबादास पिसाळ, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण घुले, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर, जामखेड बाजार समीतीचे सभापती शरद कार्ले, भाजपा तालुकाध्यक्ष बापूराव ढवळे व, माजी सभापती डॉ. भगवान मुरूमकर, रविंद्र सुरवसे, तालुकाध्यक्ष अनिल गदादे, भाजप ओबीसी मोर्चा सरचिटणीस विनोद दळवी, उपनगराध्यक्ष संतोष मेहत्रे, सचिन घुले, महेश तनपुरे, शहराध्यक्ष अमोल भगत, बांधकाम सभापती भास्कर भैलुमे, पाणीपुरवठा सभापती सतीश पाटील, नगरसेवक देविदास खरात, लालासाहेब शेळके, सुनील शेलार, रवींद्र सुपेकर, भाऊसाहेब तोरडमल, सरपंच राजेंद्र भोसले, राहुल गांगर्डे, आदित्य शिरसागर, माजिद पठाण, विजय भोसले, लक्ष्मण तापकीर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# धूम्रपानमुक्त भारताची दिशा

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यू.एच.ओ.) अकराव्या परिषदेला सुरुवात होण्याच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध झालेल्या एका नव्या अहवालात भारतासाठी आशेचा किरण दिसून आला आहे. या अहवालानुसार, भारत इ.स. २०६० पर्यंत धूम्रपानामुळे होणाऱ्या अकाली मृत्यूपासून सुमारे ऐंशी लाख लोकांचे प्राण वाचवू शकतो. जगभरात तंबाखूचे सेवन हे अजूनही एक गंभीर आरोग्यसंकट ठरले आहे. दरवर्षी सुमारे ऐंशी लाख लोक धूम्रपानाशी संबंधित आजारांमुळे मृत्युमुखी पडतात. मात्र, या अहवालात नमूद केले आहे की, आधुनिक वैज्ञानिक उपायांचा अवलंब केल्यास हे भयावह नुकसान मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकते. या उपायांमध्ये तंबाखूमुळे होणारे नुकसान कमी करणे, धूम्रपान सोडण्यासाठीचे प्रोत्साहन आणि आजारांचे लवकर निदान यांचा समावेश आहे. या सर्व प्रयत्नांमुळे इ.स. २०६० पर्यंत जगभरातील दहा कोटींपेक्षा अधिक जीव वाचवता येऊ शकतील, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. भारतातील प्रौढ धूम्रपानकर्त्यांचे प्रमाण एकवीस दशांश आठ टक्के असून, जर हानी-नियंत्रण धोरणांचा प्रभावीपणे अवलंब झाला, तर देशात ऐंशी लाखांपर्यंत लोकांचे जीव वाचू शकतात.

# कर्जुनेखारे येथे बिबट्याचा अल्पवयीन मुलीवर हल्ला

- आमदार काशिनाथ दाते सर तत्काळ घटनास्थळी दाखल, नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



गुरुवार दि. १३ नोहेंबर २०२५ नगर तालुक्यातील मौजे कर्जुनेखारे येथे बिबट्याच्या हल्ल्यात सहा वर्षीय रियंका सुनील पवार ह्या अल्पवयीन मुलीला उचलून नेल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (दि. १२ नोव्हेंबर) सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडल्याचे समजताच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. रात्री उशिरा ११ वाजता स्वतः उपस्थित राहून त्यांनी पीडित कुटुंबीयांना धीर दिला तसेच घटनास्थळाची पाहणी केली. या प्रसंगी एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, वनपरिक्षेत्र अधिकारी अविनाश तेलारे, कैलास लांडे, जन्माहद सय्यद, सरपंच प्रभाकर मगर, रोहीदास गायकवाड, मारुती बढेकर, तसेच स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून परिसरातील नागरिक बिबट्याच्या दहशतीखाली असल्याचे निदर्शनास आल्याने यावेळी आमदार दाते यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना बिबट्या सापडेपर्यंत गाव न सोडण्याच्या सक्त सूचना दिल्या. तसेच, "हा बिबट्या आता नरभक्षक स्वरूपाचा झालेला असल्याने त्याला तातडीने पकडण्यात येईल, त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता आपली व आपापल्या कुटुंबातील सदस्यांची काळजी घेण्याविषयी स्थानिक ग्रामस्थांना जागरूक केले. आमदार दाते यांनी नागरिकांना आवाहन केले की, "परिस्थिती कसलीही असुद्या, प्रसंग सुखाचा असो की दुःखाचा एक लोकप्रतिनिधी म्हणुन, आपल्या कुटुंबातील घटक म्हणुन मी कायम आपल्या सोबत आहे, प्रशासन आपले काम करेल, त्यांना परिस्थितीचे गांभिर्य ओळखून सर्वांनी सहकार्य करावे.

# राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून ज्योतीताई खेडकर यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



राज्यातील नगरपालिका निवडणूका जाहीर आणि सर्व पक्षातील नेते व कार्यकर्ते निवडणुकीच्या तयारीला लागले. त्याचाच भाग म्हणजे श्रीगोंदा नगर पालिका .श्रीगोंदा नगरपालिकेतील सर्वच पक्षांनी जरी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या असल्या तरी नगराध्यक्ष पदाचा उमेदवार जाहीर केला नाही. आज राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या वतीने अध्यक्ष पदासाठी माजी उपनगराध्यक्ष सौ .ज्योती सुधीर खेडकर यांचे नाव जाहीर कडून आघाडी घेतली.

वार्डातील नगरसेवकांच्या यादी विषयी एकत्र बसून लवकरच निर्णय घेवू असे सांगण्यात आले.

आज ज्येष्ठ नेते घनशाम शेलार यांचे निवासस्थानी पत्रकार परिषद घेण्यात आली त्या वेळी खेडकर यांचे नाव जाहीर करण्यात आले.आमच्याकडे सक्षम उमेदवार असल्यामुळे आम्हाला बाहेरच्या उमेदवाराचा विचार करण्याची गरज नसल्याचे राहुल जगताप म्हणाले. आम्ही सर्वात आधी उमेदवारी जाहीर करत आहे . यावेळी माजी आमदार राहुल जगताप, घनशाम शेलार ,नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, बाळासाहेब नाहटा,अण्णासाहेब शेलार ,ज्योती खेडकर आदी उपस्थित होते.

नगरसेवक पदाच्या उमेदवारीसाठी घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवण्यासाठी जर कोणी चर्चा करण्यासाठी आले तर आमची तयारी आहे असेही सांगण्यात आले.

# सूर्या रोशनीचा 'टर्बो फ्लेक्स' रेंजसह वायर्स व केबल्स क्षेत्रात प्रवेश

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील प्रकाश व्यवस्था, फॅन, गृहउपकरणे, स्टील आणि पीव्हीसी पाइप्स या क्षेत्रातील सर्वात विश्वासार्ह नावांपैकी एक असलेली सूर्या रोशनी लिमिटेड आता आपल्या नवीन टर्बो फ्लेक्स रेंजसह वायर्स आणि केबल्स क्षेत्रात उतरली आहे. आधुनिक घरां व व्यावसायिक ठिकाणांसाठी सुरक्षा, टिकाऊपणा आणि लवचिकतेचा उत्तम संगम साधत, कंपनीने विद्युत समाधान क्षेत्रात आपले स्थान अधिक बळकट केले आहे. ही नवीन वायर टर्बो फ्लेक्स -एफआर आणि टर्बो फ्लेक्स ग्रीन – एफआरएलएसएच या दोन प्रकारांत उपलब्ध आहेत. या वायर आरओएचएस मानकांचे पालन करतात आणि पर्यावरणपूरक, सुरक्षित व दीर्घकाल टिकणारे उत्पादन म्हणून विकसित करण्यात आले आहेत. या वायर काळा, लाल, निळा, हिरवा, करडा, पांढरा आणि पिवळा सात आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध आहेत.

# दुसऱ्याच्या कर्तुत्वावर चिखलफेक करून आपले कर्तुत्व सिद्ध होत नाही

## आ. काशिनाथ दाते सर : जातेगाव येथे पावणेदोन कोटींहून अधिक विकासकामांचे भूमिपूजन संपन्न

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

गुरुवार दि. १३ नोव्हेंबर २०२५ अनादी काळापासून कुठल्याही क्षेत्रात प्रगती होत असताना विघ्नसंतोषी प्रवृत्ती बळावत जात असते, आज आपल्या मतदारसंघातील होत असलेला विकासही अशाच काही प्रवृत्तींना सहन होत नसल्याचे दिसत असून दुसऱ्याच्या कर्तुत्वावर चिखलफेक करून आपले कर्तुत्व कधीही सिद्ध होत नाही. जनमताला पात्र होण्यासाठी समाजहित जोपासून विकासकामेच करावी लागतात ह्याची जाणीव नसेल तर येणारा काळ अशा प्रवृत्तींना जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही अशा कडक शब्दांत तालुक्यातील विघ्नसंतोषी प्रवृत्तीचा समाचार आमदार काशिनाथ दाते सर यांनी तालुक्यातील जातेगाव येथे दीड कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकासकामांच्या भूमिपूजन प्रसंगी घेतला. बुधवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी जातेगाव येथे विविध विकासकामांचे भुमिपूजन आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या विकासकामांत बामन ठिक्का गट नं. ३३५ येथे साठा बंधारा बांधकामासाठी १५ लाख, सिद्धार्थ नगर येथे रस्ता कॉंक्रिटीकरणासाठी १० लाख, श्री भैरवनाथ ट्रस्ट येथे कीर्तन हॉल बांधकामासाठी ६४.२६ लाख, भक्तनिवास बांधकामासाठी ५७.७३ लाख, सभामंडप बांधकामासाठी ११.३४ लाख तसेच किचन बांधकामासाठी २१.४५ लाख रुपये असा एकूण दीड कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर करण्यात आला आहे. या सर्व कामांच्या माध्यमातून ग्रामविकासाबरोबरच तिर्थक्षेत्र विकासालाही नवी दिशा मिळणार आहे.या प्रसंगी पुढे बोलताना आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, "गैरसमज पसरवून, टीका-टिप्पणी करून राजकीय पोळी भाजण्याचे दिवस आता संपले आहेत. पारनेर मतदारसंघातील जनता आज विकास पाहते, कामांचा हिशोब घेते आणि कोण फक्त बोलतो व कोण प्रत्यक्ष काम करतो हे ओळखते. विकासाच्या माध्यमातून सिद्ध झालेल्या नेतृत्वांची उपयुक्तता जनतेने ओळखली आहे.

म्हणूनच जनता आता घोषणांवर नव्हे तर थेट कामांवर विश्वास ठेवते आहे. जनतेला भ्रमित करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना उद्याच्या काळात जनताच ब्रेक लावेल," असे त्यांनी ठामपणे सांगितले. या कार्यक्रमास राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, भाजपाचे मंडलाध्यक्ष राहुल शिंदे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, माजी सभापती गणेश शेळके, सुरेश बोहुडे सर, वसंत चेडे, भाजपाच्या जिल्हा उपाध्यक्षा अश्विनीताई थोरात, राष्ट्रवादी महिला तालुकाध्यक्ष सुषमाताई रावडे, आर.पी.आय. तालुकाध्यक्ष राजू उबाळे, दत्तानाना पवार, सागर मैड, सुनिल थोरात, तुषार पवार, लहू भालेकर, सरपंच विठ्ठल पोटघन, सचिन ढोरमले, चेअरमन दत्तात्रय ढोरमले, सरपंच संजय गायकवाड, युवा नेते आकाश गायकवाड, विशाल फटांगडे, विजय जऱ्हाड, निलेश पोटघन, गणेश वाखारे, बाळू ढोरमले, संतोष ढोरमले, अध्यक्ष सुनीता पोटघन, अनिल ढोरमले, सोपान पोटघन सर यांसह महायुतीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भूमिपूजनामुळे जातेगाव येथील श्री भैरवनाथ देवस्थान परिसरात नव्या सोयीसुविधांचा विकास होणार असून ही सर्व कामे ग्रामविकास आणि भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी आमदार काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात सुरू असलेल्या व जलदगतीने होणाऱ्या विकासकामांचे कौतुक केले.

# बिबट्याचा धुमाकूळ, पाच ते सहा शेळ्यांचा घेतला बळी

## वनाधिकाऱ्यांकडून तात्काळ दखल

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील लोणी व्यंकनाथ येथील कानिफनाथवाडी, बोणगे_ मडके वस्ती, बोरकर वस्ती या परिसरामध्ये बिबट्याचे गेल्या अनेक दिवसापासून दर्शन होत आहे. लोणी व्यंकनाथ येथील शेतकरी निसार शेख यांनी बिबट्याच्या संदर्भात पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांना बिबट्याच्या माहिती दिली. पत्रकार कुरुमकर यांनी तात्काळ वनपरिक्षेत्र अधिकारी दिपाली भगत यांच्याशी संपर्क साधून बिबट्याच्या संदर्भात माहिती दिली. श्रीमती भगत यांनी तात्काळ वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना घटनास्थळी दाखल करण्यास सांगितले. यावेळी वन कर्मचाऱ्यांनी बिबट्याचे ठसे व पाळीव जनावरांचा बळी घेतल्यानंतर त्यांचे अवशेष घटनास्थळी दिसून आले. त्यामुळे या शिवारात बिबट्याचे अनेक वेळा वावर असल्याचे प्रत्यक्ष दर्शनी दिसून आले. यापूर्वी हंगेवाडी तालुका श्रीगोंदा येथे बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावला होता. परंतु तिथे मात्र बिबट्या जेर बंद होत नव्हता. त्यानंतर सदर पिंजरा लोणी व्यंकनाथ येथील एका शिवारात लावण्यात आला आहे. गेल्या वर्षी देखील बिबट्याने या लोणी व्यंकनाथ शिवारात मोठ्या प्रमाणात दहशत व जनावरांचा बळी घेतला. त्यावेळी देखील वनविभागाने तात्काळ दखल घेत जागोजागी बिबट्याचे दर्शन होते. तिथे वन कर्मचाऱ्यांनी पिंजरे लावण्याची व्यवस्था केली होती. परंतु तिथेही बिबट्याने हुलकावणी दिली आणि आता पुन्हा बिबट्याने लोणी व्यंकनाथ शिवारात धुमाकूळ सुरू केला. सद्यस्थितीला शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार साखर कारखान्याचे गाळप हंगाम सुरू आहेत. ऊसाला तोड लागल्यानंतर ऊसतोड मजुरांना बिबट्याची पिल्ले मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. ऊस तोडणी करताना या ऊसतोड मजुरावर देखील हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी देखील ऊसतोड होत असताना अतिशय सावधगिरीने व काळजीपूर्वक ऊस तोडणी केली पाहिजे.



मंचर : आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव ते श्री क्षेत्र भीमाशंकर रस्त्यावर असणाऱ्या पोखरी घाटाजवळ गुरुवार दिनांक १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मंठा (जालना) येथील भाविकांना घेऊन जाणारे पिकअप वाहन अपघातग्रस्त झाले. दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात वाहन उलटल्याची माहिती मिळाली.

## थोडक्यात बातम्या...

### दिवा शहरासाठी भाजपकडून वाढीव 10 MLD पाण्याची मागणी



**ठाणे (स. गांवकरी) :** ठाणे महानगरपालिका हद्दीतील वाढत्या लोकसंख्येच्या दिवा शहरासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) कडून दिवा शहरासाठी प्रतिदिन जवळपास ४० MLD पाणीपुरवठा होतो. दिवा प्रभाग समिती अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. 27 व 28 मध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाल्याने लोकसंख्येमध्ये झपाट्यानं वाढ झाली असून अंतर्गत पाण्याची लाईन तात्काळ सुरु करण्याची मागणी होत असून त्या लाईन तात्काळ सुरु कराव्यात. दिवा शहरात मोठ्या प्रमाणात लोकवस्तीमध्ये वाढ झाली असल्याने सद्यस्थितीत दिवा शहरात होणारा पाणीपुरवठा अपुरा पडत असल्याने मोठ्या प्रमाणात पाणीटंचाई निर्माण झाली आहे परिणामी रहिवाश्यांना विकत पाणी घ्यावे लागत असून ५०० लिटरला एकूण तीनशे रुपये मोजावे लागत आहे. दिवा शहरात मोठ्या प्रमाणात नागरिकरण झाल्याने लोकसंख्येमध्ये झालेली वाढ लक्षात घेता व प्रभाग क्र. 27 व 28 मध्ये सुमारे 75000 टॅक्स धारक असून प्रत्येक 5 सदस्य प्रमाणे 3,75,000 इतकी लोकसंख्या दिवा शहरात असून प्रति व्यक्ती 135 ली. प्रति मानसी प्रतिदिन याप्रमाणे सुमारे 50.60 MLD प्रतिदिन इतकी पाण्याची गरज सद्यस्थितीत असून पाणी पुरवठा हा प्रतिदिन आवश्यकतेच्या 10 MLD कमी प्रमाणात होत आहे. दिवा शहरास महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या मुख्य जलवाहिनीतून वाढीव १० MLD पाणी पुरवठा तात्काळ मिळावा ज्यामुळे दिवा शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागेल अशी दिवा भाजप मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा भाजप महिला मोर्चा अध्यक्षा सौ. सपना रोशन भगत यांनी ठाणे महापालिका आयुक्त सौरव राव यांच्याकडे मागणी केली असून आयुक्त राव यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे.

# मुख्यमंत्री यांच्या हस्ते रामकाल पथाचे भूमिपूजन

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



केंद्र सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या माध्यमातून 'स्पेशल असिस्टंट टू स्टेटस् फॉर कॅपिटल इन्व्हेसमेन्ट' योजनेंतर्गत ९९ कोटी १४ लाख रुपये खर्चातून रामकुंडसह परिसरात साकारण्यात येणाऱ्या रामकाल पथचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गुरुवारी भूमीपूजन करण्यात आले.

नाशिक येथील रामकुंड परिसरात झालेल्या या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीष महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, आमदार ॲड. राहुल ढिकले, आमदार दिलीप बनकर, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, कुंभमेळा अतिरिक्त आयुक्त कल्पना नायर, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी संकल्पचित्र आणि प्रतिकृतीच्या माध्यमातून रामकाल पथाची माहिती जाणून घेतली. रामकाल पथ प्रकल्पाच्या माध्यमातून रामकुंड मार्ग, रामकाल पथवरील संपूर्ण संरचनांचे संवर्धन, दर्शनी भागांचा जीर्णोद्धार तसेच पर्यटकांसाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. रामकुंड, सीता गुंफा, काळाराम मंदिर, राम लक्ष्मण गुंफा आणि इतर ऐतिहासिक मंदिर परिसराचे आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व प्रकल्पामुळे भाविकांपर्यंत पोहोचेल.

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे 2027 मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्यादृष्टीने नाशिकचे सांस्कृतिक महत्व जगभरात पोहोचविण्यासाठी शासनातर्फे मोठ्या प्रमाणात विकास कामे हाती घेण्यात आली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून केंद्र सरकारच्या साह्याने हा प्रकल्प उभारला जात आहे. देशभरातून गोदातटी येणाऱ्या भाविकांसाठी आनंददायी अनुभव देण्याच्या दृष्टीने आणि या पवित्र स्थळाचे स्थान महात्म्य त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी हा प्रकल्प महत्वाचा ठरणार आहे.

रामकाल पथ प्रकल्पाच्या भूमिपूजनानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस आणि उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी काळाराम मंदिराला भेट देत दर्शन घेतले. यावेळी मंदिराच्या विश्वस्तांतर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# प्रभाग २३ मधील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडलेल्या विकास कामाच्या भूमि पूजन नाशिक- त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त होणाऱ्या विविध विकास कामांना गुरुवारी १३ नोव्हेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पाच हजार ६५७ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला. कुंभमेळ्यानिमित्त सुरू होणाऱ्या विविध विकास कामांमुळे नाशिक शहरासह जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. या कामांमुळे जिल्ह्यातील पायाभूत सोयीसुविधा बळकट होऊन रोजगाराला चालना मिळणार आहे. ठक्कर मैदान, एबीबी सर्कल, त्र्यंबक रोड, नाशिक येथे हा कार्यक्रम दिमखात संपन्न झाला. आहे. उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे , अजित पवार, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, छगन भुजबळ , दादाजी भुसे यांच्यासह राज्य मंत्रिमंडळातील मंत्री आमदार खासदार या कार्यक्रमास उपस्थित होते.

या कार्यक्रमास प्रभाग 23 मधील ज्येष्ठ नागरिक महिला भगिनी युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमास उपस्थिती लावली. माजी महापौर सतीश नाना कुलकर्णी , संध्याताई कुलकर्णी अध्यक्ष आदिशक्ती स्त्री प्रतिष्ठान, संयोजकवैभव दादा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विघ्नहरण गणेश देवस्थान डीजीपी नगर 1 येथून ३ बसेस मध्ये परिसरातील महिला भगिनी ज्येष्ठ नागरिक युवक युवती यांनी सभेसाठी बसमध्ये रवाना झाले.

# कुंभमेळ्यासाठी साडेपाच हजार कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमीपूजन

## दर्जेदार विकासकामांनी नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करणार : मुख्यमंत्री

- साधूसंतांचे मार्गदर्शन आणि नागरिकांच्या सहकार्याने कुंभपर्व यशस्वी होण्याचा मुख्यमंत्र्यांना विश्वास

**नाशिक: (समर्थ गांवकरी)**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे आणि नाशिक महानगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने होणाऱ्या नाशिक शहरातील ५ हजार ६५७ कोटी ८९ लाख रुपये खर्चाच्या विकासकामांचे भूमीपूजन करण्यात आले. सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे दर्जेदार आणि पारदर्शक पद्धतीने करून नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करणार, अशी ग्वाही देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

ठक्कर मैदान येथे आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीष महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, क्रीडा मंत्री माणिकाराव कोकाटे, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार शोभा बच्छाव, राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार व नगर विकास विभागाचे अपर सचिव गोविंदराज (दूरदृष्यप्रणालीद्वारे), जिल्ह्याचे पालक सचिव एकनाथ डवले, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ.प्रविण गेडाम, आयुक्त शेखर सिंह आदी उपस्थित होते.

मागील कुंभमेळ्याचे चांगले आयोजन करण्यात आल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, यावेळी कुंभमेळ्यात गतवेळेपेक्षा पाचपट अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. भाविकांची व्यवस्था, सुरक्षा, पर्वस्नान व अमृतस्नानाचे नियोजन आणि या सोहळ्याचा मुळ गाभा असलेल्या आध्यात्मिकतेचा अनुभव भाविकांना देण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. त्यासाठी नाशिकमध्ये केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून २० हजार कोटीपेक्षा अधिकची कामे सुरू करण्यात येत आहेत. कुंभमेळ्यापर्यंत ही रक्कम २५ हजार कोटींपर्यंत पोहोचण्याची शक्यता असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभ्या राहतील. शासनाच्या सर्व विभागांनी समन्वयाने कामे केल्याने मोठ्या प्रमाणात कामाला सुरूवात होत आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या नागरिकांनीही यासाठी सहकार्य केले असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, कुंभमेळ्यासाठी रस्ते, महामार्ग दुरूस्ती, पिण्याच्या पाण्याची योजना, गोदावरीचे पावित्र्य राखणे, चांगल्या घाटांची निर्मिती, जुन्या मंदिरांचे पुनरुज्जीवन, विकासकामे करतांना गोदाघाटाचे पुरातन रुप कायम ठेवणे यावर भर देण्यात येत आहे. नाशिक हे महत्वाचे तीर्थक्षेत्र असल्याने इथे होणारी विकासकामे पुढील २५ वर्ष टिकली पाहिजे आणि नाशिक पर्यटनक्षेत्र म्हणून विकसीत व्हावे असा प्रयत्न या माध्यमातून होत आहे. या विकासकामांच्या माध्यमातून नाशिकचे रुप बदलेल आणि शहराच्या सर्वांगिण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कुंभमेळ्यात भाविकांचे व्यवस्थापन व्हावे यासाठी बाह्य वर्तुळाकार मार्ग तयार होत असून भविष्यातल्या नाशिकसाठी याचा फायदा होणार आहे. नाशिक विमानतळावर नवीन टर्मिनल इमारत, रेल्वे सुविधा, बस स्थानकाची सुविधा, स्मार्ट सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून आधुनिक नाशिक शहर विकसीत करण्यावर भर देण्यात येत आहे. एकूण बाराशे एकर जागा अधिग्रहीत करून त्यावर कुंभाचे आयोजन करण्यात येत आहे. भविष्यातही कुंभच्या आयोजनात कुठलीही अडचण राहणार नाही असा प्रयत्न आहे. कुंभमेळ्याची ही सर्व कामे पारदर्शी पद्धतीने होतील अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. विकासकामे करतांना नागरिकांचे नुकसान होऊ देणार नाही, तथापि सामाजिक कार्य समजून नागरिकांनीही विकासकामांना सहकार्य करावे. साधूसंतांनी शासनाला कुंभमेळा आयोजनासाठी मार्गदर्शन करावे, त्यांचे मार्गदर्शन महत्वाचे आहे,

सिंहस्थ कुंभमेळ्यात ७५ वर्षानंतर त्रिखंड योग जुळून आल्याने हे कुंभपर्व विशेष असून ते २८ महिने चालणार आहे. ४० ते ४२ पर्वस्नान आणि महत्वाचे अमृतस्नान या कुंभात होणार आहे. प्रयागराज कुंभमेळ्यात देशातील सांस्कृतिक पुर्नजागरणाच्या मोहिमेची प्रचिती आली. याच कुंभच्या परंपरेत नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा कुंभमेळा महत्वाचा मानला जातो. प्रयागराज येथे १५ हजार हेक्टर जागा असून नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे ५०० एकर जागा आहे. अत्यंत कमी जागा असूनही २०१५ मध्ये कुंभमेळ्याचे चांगले आयोजन करण्यात आले. यावेळीदेखील असे आयोजन व्हावे याद्दष्टीने शासन आणि प्रशासनाने त्यासाठी आवश्यक तयारी सुरू केली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, सिंहस्थ कुंभमेळ्यामुळे नाशिकचा चेहरामोहरा बदलेल आणि शहराचा नियोजनबद्ध विकास होईल. त्याद्दष्टीने प्रशासनाने चांगली तयारी केली आहे. कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी राज्य शासनाने फार पूर्वीपासून तयारी सुरू केली आहे. नाशिकची जगाच्या नकाशावर ओळख निर्माण करणारा हा सोहळा असेल. कुंभपर्व ही नाशिकला सुंदर आणि आधुनिक शहर करण्याची ही संधी आहे.

सोहळ्याकरिता दर्जेदार सुविधा निर्माण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. सोहळा यशस्वी करण्यासाठी उत्तम नियोजन आणि अंमलबजावणीची आवश्यकता असून त्याद्दष्टीने प्रशासन कार्यरत आहे. मोठ्या संख्येने भाविक येणार असल्याने सुरक्षेची मोठी जबाबदारी शासन-प्रशासनावर असून त्यासाठी आवश्यक तयारी करण्यात येत आहे. सुरक्षेसाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा उपयोग करण्यात येणार आहे. गोदावरीला दक्षिण गंगा म्हटले जाते आणि विकासकामांच्या शुभारंभाच्या माध्यमातून नाशिक शहरात विकासाची गंगा येत आहे, असे उपमुख्यमंत्री म्हणाले.

साधूग्राम, स्वच्छता व्यवस्था, रामकुंड आणि कुशावर्तचे पावित्र्य आदी सर्व बाबींवर लक्ष देण्यात येत आहे. कुंभमेळ्याच्या प्रसिद्धीसाठी डिजीटल माध्यमांचा उपयोग करण्यात येणार आहे. येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. उत्तम नियोजनाद्वारे कुंभमेळ्याचा लौकीक जगभर पोहोचेल, असा विश्वास श्री.शिंदे यांनी व्यक्त केला.

कुंभमंत्री श्री.महाजन म्हणाले, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने विविध विकासकामांचा शुभारंभ होत आहे. मागील कुंभमेळ्याची दखल घेवून अमेरिकेत शासनाचा सन्मान करण्यात आला होता. यावर्षीदेखील दीड वर्षांनी नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याचा लौकीक जगभरात पोहोचणाार आहे. यावेळी गतवर्षीपेक्षा अधिक भाविक येण्याची शक्यता आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे प्रयागराजच्या तुलनेत जागा कमी असल्याने येणारा कुंभमेळा सुरक्षित व्हावा यासाठी शासन आणि प्रशासन आतापासून वेगाने काम करीत आहे. स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित कुंभमेळा होण्याच्याद्दष्टीने नियोजन करण्यात येत आहे. कायदा-सुव्यवस्थेचे वातावरण कायम ठेवण्यासाठी पोलीस दलातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. नाशिक शहराचा विकास, पर्यटनाला चालना आणि रोजगार निर्मितीसाठी कुंभमेळा महत्वाचा असून साधू-महंत आणि नाशिकरांनी सहभागी व्हावे, घरचे कार्य समजून देशभरातून येणाऱ्या भाविकांच्या आदरातिथ्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविकात डॉ.गेडाम यांनी कुंभमेळ्यानिमित्त करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांची माहिती दिली. सुरक्षित आणि स्वच्छ कुंभमेळा करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. कुंभमेळ्यासाठी येणारे भाविक, साधू-महंत, पर्यटक आणि नाशिकच्या नागरिकांना अद्वितीय धार्मिक, सांस्कृतिक पर्यटनाची अनुभूती मिळेल याद्दष्टीने प्रशासन कार्यरत आहे. नाशिकच्या पायाभूत सुविधा आणि पर्यटनासह ही पर्वणी सर्वांगिण विकासाला चालना देणारी असेल असे प्रकल्प विचाराधीन आहेत. डिजीटल आणि अत्याधुनिक कुंभ करण्यासाठी कृत्रिम बुद्धीमत्तेचा उपयोग करण्यात येत आहे. सीसीटीव्ही प्रकल्पासह ५ हजार ६५७ कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे भूमिपूजन होत आहे. भारत सरकारकडून रेल्वे, रस्ते आदी विविध कामांसाठी ९ हजार ३८२ कोटी रुपयांचे प्रकल्प विविध स्तरावर प्रगतीपथावर आहेत. राज्य शासनाकडूनही पुढील टप्प्यात आणखी १० हजार कोटी रुपयांचे प्रकल्प प्रस्तावित आहेत. कामांना गती देण्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. विकासकामे मार्च २०२७ पर्यंत पूर्ण झाल्यानंतर नाशिकमध्ये विकासाचा अमृतकुंभ येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला विविध आखाड्याचे साधू-महंत, आमदार किशोर दराडे, पंकज भुजबळ, ॲड. राहुल ढिकले, आमदार दिलीप बनकर, आमदार देवयानी फरांदे, आमदार सीमा हिरे, आमदार राहूल आहेर, मंगेश चव्हाण, दिलीप बोरसे, विशेष पोलीस निरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, एमएमआरडीए आयुक्त जलज शर्मा, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, कुंभमेळा अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे आदी उपस्थित होते.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक व त्र्यंबकेश्वर येथे व्यापक पायाभूत सोयीसुविधा उभारणी, सुरक्षा व्यवस्थेचे बळकटीकरण, स्वच्छता, व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थेचे सुलभीकरण, धार्मिक पर्यटनाच्या सोयीसुविधांचे अद्ययावतीकरणासाठी महत्वपूर्ण प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. या कामांसाठी एकूण ५ हजार ६५७ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित आहे.

मुख्य कामांमध्ये नवीन पूल बांधण्यासाठी ९४ कोटी ८७ लाख रुपये, नाशिक शहरात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वयानासाठी ४३६ कोटी ५६ लाख रुपये, नाशिक शहरात मल:निस्सारण प्रकल्प उभारणीसाठी १ हजार ४७५ कोटी ५० लाख रुपये, नाशिक शहरात गोदावरी काठावर रामकाल पथनिर्मितीसाठी १२० कोटी ८८ लाख रुपये, नाशिक महानगरपालिकेतर्फे ६८४ कोटी रुपये किंमतीची पाणीपुरवठा योजना विस्ताराचे काम प्रस्तावित आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे दोन हजार २७० कोटी ६० लाख रुपये किमतीचा रस्ते विकासाचा मोठा पायाभूत प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पांमुळे कुंभमेळ्यानिमित्त होणाऱ्या गर्दीचे नियंत्रण आणि व्यवस्थापन, वाहतूक व्यवस्थापन, पायाभूत सोयीसुविधांची निर्मिती, सुरक्षा, स्वच्छता, पाणीपुरवठा, पर्यटनाच्या सुविधा व धार्मिक वारसा संरक्षणात मोठी भर पडणार आहे.

### विकासकुंभाची अशी होणार सुरूवात

नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नियोजित विकासकामांचे भूमीपूजन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कामांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे २ हजार २७० कोटी रुपये, तर नाशिक महानगरपालिकेतर्फे ३ हजार ३३८ कोटी रुपयांची विकास कामे प्रस्तावित आहेत.

# 75 विद्यार्थ्यांना बालदिनी 'बालचित्रकार पुरस्कार' जाहीर

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

शिक्षकांचे व्यासपीठ असलेल्या शिक्षक ध्येय मासिकातर्फे राज्यातील विद्यार्थ्यांसाठी 'ऑनलाइन चित्रकला स्पर्धा – २०२५' चे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण चित्रकला स्पर्धेचे आयोजन प्रतिवर्षी करण्यात येते. विद्यार्थ्यांना चित्रकलेसाठी प्रोत्साहन देणे, त्यांच्या कलेचे कौतुक करणे हाच या स्पर्धे मागील मुख्य उद्देश असल्याचे संपादक मधुकर घायदार नाशिक यांनी सांगितले.

राज्यातील विद्यार्थ्यांमधून तीन गटात ही चित्रकला स्पर्धा आयोजित केली होती. अ गट (इयत्ता पहिली ते पाचवी); ब गट (इयत्ता सहावी ते दहावी); क गट (इयत्ता अकरावी ते पदवी) अ, ब आणि क गटातील एकूण ७५ उत्कृष्ठ बाल चित्रकारांना दिल्या जाणाऱ्या पारितोषिकामध्ये सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र यांचा समावेश आहे. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना 14 नोव्हेंबर बालदिनी सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. विजेत्यांमध्ये अ गटात प्रसाद ठोंबरे (मुंबई), प्रार्थना नाईक (सिंधुदुर्ग), प्रचिती गायकर (पालघर), सार्थक चव्हाण (नवी मुंबई), हलीमा अन्सारी (पुणे), प्रकृती राऊत (वर्धा), निंधी धोटे (वर्धा), ईश्वरी करपे (वर्धा), नेहांत राऊत (वर्धा), पार्थ शिंपी (धुळे), तनुल परमार (मुंबई), तितिक्षा परमार (मुंबई), आयेशा राठोड (धारशिव), आकांक्षा राठोड (धारशिव), हर्षद राठोड (धाराशीव), ऋग्वेद घाडी (मुंबई), आराध्या डोंगरे (अमरावती), कौस्तुभ महाजन (जळगांव), नमो बेलदार (नंदुरबार), अरमान बन्सोड (चंद्रपूर), धवल बन्सोड (चंद्रपूर), आराधना जयन्नावर (सांगली), प्रांजल पाटील (नंदुरबार), निधि धानोरकर (वर्धा), प्रनंद पाटील (नंदुरबार), कृष्णाली अडेकर (अमरावती), अन्वित टंकसाळे (नागपूर), कुणाल तडवी (नंदुरबार), पूर्वी पावरा (नंदुरबार), जय गोरवे (सोलापूर), श्रावस्ती पाटील (अमरावती), सम्राट महिरे (मुंबई), महेश्वरी मेतकर (मुंबई), राजवी पाटील (नवी मुंबई), रियांशी बनकर (नवी मुंबई), आर्यन हाडके (नवी मुंबई), ईशा भोईर (मुंबई), आर्यन पाडावे (मुंबई), लावण्य आंग्रे (मुंबई), आर्यन कोळेकर (मुंबई), तनू माली (मुंबई), विहान पवार (मुंबई), सिया वाघ (सिंधुदुर्ग), सोमनाथ पवार (धाराशीव), पूजा ढोमणे (अमरावती), वैष्णवी हेडाऊ (अमरावती), देवांशी शिरभाते (अमरावती), दिव्या धार्मिक (अमरावती); आणि ब गटात स्वाती ऐवळे (सांगली), श्रेयश भसारकर (गडचिरोली), तेजस पाटील (नंदुरबार), मंथन राऊत (मुंबई), जॉईल लोबो (सिंधुदुर्ग), प्रिया देसाई (सिंधुदुर्ग), श्रावणी खासबागे (अमरावती), लोकेश पाटील (धुळे), अन्वयी कदम (रत्नागिरी), नगमा अंसारी (पुणे), मारिया अंसारी (पुणे), पायल गवळी (अहिल्यानगर), महेंद्र वळवी (अहिल्यानगर), दिक्षा खुताडे (अहिल्यानगर), उर्वशी पागी (अहिल्यानगर).




आळंदी : आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या ४ थ्या दिवशी तीन उमेदवारांनी चार नामनिर्देशनपत्रे दाखल केले आहेत. नगराध्यक्षपदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रकाश पंढरीनाथ कुऱ्हाडे यांचेसह ४ अर्ज दाखल झाले आहेत.

## थोडक्यात बातम्या...

### भारतात्मा वेद पुरस्कार सोहळा १७ नोव्हेंबर रोजी पुण्यात होणार




- भारतातील वैदिक परंपरांच्या जतन आणि शिक्षणासाठी उत्कृष्टतेचा होणार गौरव

पुणे (स. गांवकरी) : स्वर्गीय श्री अशोकजी सिंघल जी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन करण्यात आलेल्या प्रतिष्ठेच्या भारतात्मा वेद पुरस्काराचे वितरण १७ नोव्हेंबर रोजी करण्यात येणार आहे. पुण्यातील दादासाहेब दरोडे सभागृह, आगरकर रोड, बीएमसीसी कॉलेज जवळ , शिवाजीनगर येथे होणाऱ्या समारंभात परमपूज्य स्वामी श्री गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या उपस्थितीत आणि परमपूज्य आचार्यजी श्री प्रद्युम्नजी महाराज यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल. भारतात्मा वेद पुरस्काराच्या माध्यमातून वैदिक शिक्षण आणि विद्वत्तेचा गौरव करण्यात येतो. विश्व हिंदू परिषदेचे संस्थापक सदस्य असलेल्या स्व. सिंघल यांनी श्रीराम जन्मभूमी चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली. विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांनी दोन दशकांहून अधिक काळ काम केले. ते भारताच्या प्राचीन ज्ञानाचे एकनिष्ठ अनुयायी होते तसेच वैदिक ज्ञान परंपरा आणि गुरुकुल शिक्षण प्रणालीच्या पुनरुज्जीवन आणि प्रसारासाठी अत्यंत कटिबद्ध होते. स्व. सिंघल यांनी त्यांच्या संपूर्ण आयुष्यात वेदांचा अभ्यास आणि आचरण यांचे जतन व त्याला प्रोत्साहन देण्यासाठी अमूल्य योगदान दिले. भारतात्मा वेद पुरस्काराचे गेल्या आठ वर्षांपासून दरवर्षी प्रदान केला जात असून हे त्याचे नववे वर्ष असून आहे. तीन श्रेणींमध्ये असामान्य योगदानांचा या पुरस्काराच्या माध्यमातून गौरव करण्यात येतो.




### इन्फोसिस सायन्स फाऊंडेशनकडून इन्फोसिस प्राइजच्या विजेत्यांची घोषणा

पुणे (स. गांवकरी) : इन्फोसिस सायन्स फाउंडेशनने (आयएसएफ) आज अर्थशास्त्र, अभियांत्रिकी आणि संगणक विज्ञान, मानव्यविद्या आणि सामाजिक विज्ञान, जीवन विज्ञान, गणितीय विज्ञान व भौतिक विज्ञान या सहा श्रेणींमध्ये इन्फोसिस प्राइज २०२५ च्या विजेत्यांची घोषणा केली. इन्फोसिस पुरस्काराने २००९ मध्ये स्थापन झाल्यापासून अशा व्यक्तींच्या उल्लेखनीय कामगिरीचा सन्मान केला आहे ज्यांचे संशोधन आणि त्यांच्या शिष्यवृत्ती भारतावर लक्षणीय परिणाम करतात. प्रत्येक श्रेणीतील पुरस्कारात सुवर्णपदक, प्रशस्तिपत्र आणि १००,००० अमेरिकन डॉलर्स (किंवा भारतीय रुपयामध्ये त्याच्या समतुल्य) बक्षीस रक्कम समाविष्ट आहे. इन्फोसिस प्राइज २०२५ च्या विजेत्यांची निवड प्रसिद्ध विद्वान आणि तज्ञांच्या आंतरराष्ट्रीय ज्युरी पॅनेलने केली होती. आपल्या स्थापनेपासून आयएसएफने मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर प्रभाव पाडणाऱ्या अभूतपूर्व संशोधन आणि शिष्यवृत्तींना मान्यता दिली आहे. या पुरस्काराने २०२४ पासून वयाच्या ४० वर्षांखालील संशोधकांना सन्मानित करण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे, अपवादात्मक प्रतिभेची लवकर ओळख प्रस्थापित करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. कारकीर्दीच्या सुरूवातीच्या टप्प्यात असलेल्या संशोधकांचे हे प्रोत्साहन पुढील पिढीतील विद्वान आणि नवसंशोधकांसाठी प्रेरणादायी ठरेल.

### 'सोनालिका'चा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये प्रवेश

- 'सोनालिका'चे बांगलादेशातील दीर्घकाळापासून वितरक असलेल्या एसीआय मोटर्स लिमिटेडने एका कार्यक्रमात अवघ्या
- ४ तासांत ३५० ट्रॅक्टरची सर्वात मोठी डिलिव्हरी करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नाव नोंदविले

पुणे (स. गांवकरी) : भारतातील नंबर १ ट्रॅक्टर निर्यात ब्रँड 'सोनालिका' ट्रॅक्टरचे बांगलादेशातील वितरक एसीआय मोटर्स लिमिटेडने एकाच दिवसात आतापर्यंतची सर्वात मोठी ट्रॅक्टर डिलिव्हरी करून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे कंपनीने जागतिक स्तरावर आपले वर्चस्व अधिक बळकट केले आहे. प्रगती, उत्पादकता आणि भागीदारीचा उत्सव साजरा करण्यासाठी बांगलादेशातील दिनाजपूर येथे "सोनालिकार बिशोजोय" या संकल्पनेवर नुकत्याच आयोजित केलेल्या एका भव्य समारंभात अवघ्या ४ तासांत ३५० ट्रॅक्टर डिलिव्हरी करण्याचा हा असामान्य विक्रम नोंदविण्यात आला. या कामगिरीबद्दल विचार मांडताना इंटरनॅशनल ट्रॅक्टर लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीपक मित्तल म्हणाले, "भारताच्या उत्कृष्टतेतून जगाला प्रेरणा मिळू शकते या दृढ विश्वासाने 'सोनालिका'च्या वारशाला प्रेरणा मिळते. म्हणूनच 'सोनालिका'चा प्रत्येक ट्रॅक्टर हा भारताच्या काटेकोर अभियांत्रिकी कौशल्याचे आणि जागतिक पातळीवर लाखो स्वप्नांना बळ देणाऱ्या ब्रँडच्या अथक चेतनेचे साकार रूप असतो. बांगलादेशातील आमचे वितरक एसीआय मोटर्स यांनी साध्य केलेला हा नवीन गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आमच्या प्रवासावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला आणि प्रत्येक भागीदाराला आम्ही दिलेली मानवंदना आहे. जगभरातील शेतकऱ्यांना सक्षम बनवण्याच्या आमच्या ध्येयाची आज आम्ही ग्वाही देत असताना, 'सोनालिका' कुटुंबातील प्रत्येक सदस्य आज अभिमानाने फुलून आलेला आहे." एसीआय मोटर्स लिमिटेड यांच्यासह गेल्या १८ वर्षांच्या भागीदारीमध्ये 'सोनालिका' ट्रॅक्टरने बांगलादेशमध्ये स्वतःच्या हेवी ड्युटी ट्रॅक्टरद्वारे आपले अग्रणी स्थान सातत्याने मजबूत केले आहे.

# ग्रामीण पोलीसांनी अवैध रित्या वाळू उपसा करणाऱ्या १९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

## एक कोटी चाळीस हजारचा मुद्देमाल जप्त

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

वाळु माफियांवर नांदेड ग्रामीण पोलीसांची मोठी कारवाई ड्रोन च्या सहाय्याने पळालेले आरोपी व लपवुन ठेवलेले इंजीन ताब्यात घेवून सुमारे १, कोटी ००, ३९, ४००/- रुपयाचा मुद्देमाल केला जप्त केला असुन जवळपास नऊ बिहारी कामगारासह दहा मालका विरुद्ध पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण येथे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे दाखल केले असून या केलेल्या कार्यवाही मुळे खळबळ उडाली असून जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या सह वरीष्ठ अधिकारी यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

या प्रकरणी पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,फिर्यादी पोहेकों वसंत केंद्रे, पो.स्टे. नांदेड ग्रामीण

गुरनं १०७८/ २०२५ कलम ३०३( २), ३( ५) भा.न्या.सं. सहकलम ४८( ७), ४८( ८) महाराष्ट्र जमीन महसुल माहिती अधिनियम

दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी वेळ ५.ते १२ वाजता च्या दरम्यान काळेश्वर, विष्णुपुरी, मार्कड, पिंपळगाव भणगी वाहेगाव, गंगाबेट, कल्लाळ गोदावरी नदीपात्रात व किनाऱ्यावर

अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड,श्रीमती अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक,



भोकर,सुरज गुरव अप्पर पोलीस अधीक्षक, नांदेड प्रशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी उप विभाग इतवारा नांदेड, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर,सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकट कुसमे, उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड पोहेकॉ केंद्रे, पोहेकॉ अर्जुन मुंडे, पोकॉ मारोती पचलींग, पोकों पवार,पोकॉ कल्याणकर, पोकॉ लव्हारे, पोकॉ पैनापल्ले, पोकॉ चावरे, पोकॉ भिसे, पोकॉ समीर, पोकॉ शेख जमीर, पोकॉ शेख आसीफ, पोकों धम्मपाल कांबळे, सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण यांनी अवैध रित्या उत्खनन करणारे आरोपी, गणेश लखन जाधव वय ५० रा. सिन्हा ता. वाढार जिल्हा आरा बिहार,बिलास परमेश्वर सहानी वय ५० वर्ष रा. श्रीपुर डेरा ता. टकरसुन जिनहा बलिया उत्तरप्रदेश मुन्ना बिरवाहथुर चौधरी वय ४१ वर्ष रा. दामोधरपुर ठाणा सहापुर जिल्हा भोजपुर बिहार,सरोज छोटेलाल चौधरी वय ३० रा. दुल्हापुर ता. शेवराई जिल्हा गाजीपुर उत्तरप्रदेश ,शिवकुमार जमना बिंद वय ३५ वर्ष रा. जपतुर ता. जि. गाजीपुर उत्तरप्रदेश,विजय शंकर सहानी वय ३० वर्ष रा.धोगमा ता. पुसा जि. समस्तपुर बिहार वकील मिश्री सहानी वय ४८ वर्ष रा.जात ता. गायघाट जिल्हा मुझ्यापुर बिहार सजिवन घुरुल विन वय ४१ वर्ष रा. चकी जि. बक्सर बिहार ९) छोटक हरेराम बिन वय ३२ वर्ष रा. चकी जि. बक्सर बिहार, अर्जुन विलासराव श्रीरसागर वय ३० वर्ष रा. बोरगाव तेलंग तालुका जिल्हा नांदेड (मालक) शंकर आंबादासराव पवार वय ३२ वर्ष रा. कोरका ता.जि. नांदेड (मालक) राजकुमार सोनटक्के रा. गंगावेट (मालक)नारायण पुंड रा. पिंपळगाव (मालक) पपन क्षिरसागर रा. कल्लाळ (मालक) रामदास क्षिरसागर रा. कल्लाळ (मालक) शिवाजी हंबर्डे रा. विष्णुपुरी (मालक).

# सिग्नेचर ग्लोबलच्या स्टॉकमध्ये ७५% पर्यंत वाढ अपेक्षित

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

SIGNATURE GLOBAL
REALTY. RELIABILITY. RESPONSIBILITY.

रिअल इस्टेट क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडच्या समभागात गुंतवणूकदारांना मोठी वाढीची संधी दिसत आहे. देशातील तीन प्रमुख ब्रोकरेज फर्म्सनी – आयसीआयसीआय सिक्युरिटीज, ॲक्सिस कॅपिटल आणि नुवामा – कंपनीची स्थिर व्यवसाय गती आणि दीर्घकालीन वाढीची क्षमता लक्षात घेऊन या स्टॉकसाठी 'खरेदी' (बाय) रेटिंग कायम ठेवली आहे. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १,०२९.९० रुपयांवर उघडलेल्या या समभागासाठी आयसीआयसीआय सिक्युरिटीजने १,७८६ रुपये, तर ॲक्सिस कॅपिटलने १,७८० रुपये आणि नुवामाने १,३७६ रुपयांचे लक्ष्य दिले आहे.

या लक्ष्य किमतींमुळे सिग्नेचर ग्लोबलच्या स्टॉकमध्ये ७५% पर्यंत वाढ होण्याची शक्यता दिसून येते. सिग्नेचर ग्लोबलने आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या सहामाहीत ४६.६ अब्ज रुपयांची पूर्व विक्री नोंदवली असून १२.० अब्ज रुपयांचा महसूल नोंदवला आहे.

# शेतकऱ्यांचे अनुदान तात्काळ खात्यावर जमा करा

**वैजापुर : (समर्थ गांवकरी)**

अतिवृष्टी झाल्यानंतर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून त्यांचे अनुदान लवकरात लवकर शेतकयांच्या खात्यात जमा करा अन्यथा तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष प्रकाश बापू ठुबे यांनी प्रशासनाला दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदश्चंद्र पवार गट) वतीने तहसीलदार यांना दुष्काळी अनुदान तात्काळ मिळावे यासाठी निवेदन देण्यात आले त्या निवेदनात म्हणटले आहे की, दि. २८ व २९ आक्टोंबर रोजी महाराष्ट्रात अतिवृष्टी झाली यामध्ये वैजापुर तालुक्यातील शेतकर्याचेही




मोठ्या प्रमाणात नुकसान झाले . हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून नेला. दुभती जनावरे पाण्याच्या पुरात वाहुन गेली. मका, कापुस सोयाबीन यांचे मोठे नुकसान झाले. सरकारने तत्परता दाखवत त्यांना तात्काळ मदत करण्याची घोषणाही केली. त्यानंतर पंचनाम्यांची प्रक्रिया सुरु केली परंतु ई-केवायसी नसेल तर अनुदान जमा होण्यास अडचणी निर्माण झाल्या. शासनाने जाहीर केलेले अनुदान अत्यल्प होते. शेतकऱ्यांचे नुकसान पाहता मिळणारे अनुदान पुरेशे नव्हते. त्यानही ई-केवायसी नसल्यामुळे शेतक-यांना सेतु केंद्रावर चकरा माराव्या लागत आहेत हि सर्व परास्थिती बघता शासनाने ई-केवायसी करण्यासाठीची आवश्यक बेवसाईट तात्काळ सुरू करावी आणि शेतक-यांच्या खात्यात पुरेसे अनुदान जमा कराने अन्यथा तहसील कार्यालयासमोर २० नोव्हेंबर पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही यावेळी तालुकाध्यक्ष प्रकाश बापु ठुबे यांनी दिला असून या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रकाश बापू ठुबे पाटील, शहराध्यक्ष जुबेर भाई चाऊस, जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया सावंत पाटील, काँग्रेसचे नेते दिगंबर वाकचौरे , नारायण पवार माजी उपसरपंच , काकासाहेब मोगल, दादासाहेब डुकरे आदिंच्या सह्या आहेत.

# फरार आरोपीस अटक, अपर अधीक्षक, श्रीरामपुर कार्यालयाची कारवाई

**श्रीरामपूर/नेवासा : (समर्थ गांवकरी)**

याबाबत अधिक माहिती अशी की,श्री. सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर व श्री. सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक,श्रीरामपुर यांनी गुन्हयातील फरार व पाहिजे आरोपीचा शोध घेवुन त्यांना अटक करण्याची मोहिम हाती घेतली आहे. दिनांक ११/११/२०२५ रोजी सकाळी श्री. सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपुर यांना गोपनीय माहिती मिळाली की, शनिशिंगणापुर पोलीस स्टेशन गु.र.नं.२४८/२०२५ भा.न्या.सं. कलम १०९,११८(१),११५(२),१८९ (२), १८९



(४) आर्म ॲक्ट ४/२५,७ या खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्हयामधील फरार आरोपी अजय बापुसाहेब कुऱ्हाट हा शिंगणापुर येथे लपुन बसला आहे. त्याअनुशंगाने अपर पोलीस अधीक्षक,श्रीरामपुर कार्यालयातील पो.ना. संदीप दरंदले, पो.कॉ. राजेंद्र बिरदवडे, पो.कॉ. सहदेव चव्हाण, पो.कॉ. अशोक गाढे यांना सदर आरोपीचा शोध घेवुन त्यास तात्काळ ताब्यात घेणेकरीता आदेशीत केले होते. त्यानंतर नमुद पथकाने शनिशिंगणापुर येथे जावुन आरोपी याचा मिळालेल्या गोपनीय माहितीचे व तांत्रिक विश्लेषनाचे आधारे शोध घेतला असता आरोपी अजय बापुसाहेब कुऱ्हाट, वय २१ वर्ष, रा.शिंगणापुर, ता. नेवासा हा मिळुन आला आहे. सदर आरोपी हा शनिशिंगणापुर पोलीस स्टेशन गु.र.नं. २४८/२०२५ भा.न्या.सं. कलम १०९,११८(१),११५ (२),१८९(२), १८९ (४) आर्म ॲक्ट ४/२५,७ प्रमाणे खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्हयामधील पाहिजे असल्याने सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्यास शनिशिंगणापुर पोलीस स्टेशनकडे सुपूर्त केले आहे. गुन्हयाचा पुढील तपास स.पो. नि. अशिष शेळके, शनिशिंगणापुर पोलीस स्टेशन हे करीत आहे.सदरची कारवाई ही श्री. सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, श्री. सोमनाथ वाघचौरे, अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपुर, श्रीरामपूर यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक, श्रीरामपुर कार्यालयातील पो.ना. संदीप दरंदले, पो.कॉ. राजेंद्र बिरदवडे, पो.कॉ. सहदेव चव्हाण, पो.कॉ. अशोक गाढे, यांनी केली आहे.

# लग्नाच्या हंगामासाठी नवीन कलेक्शनचे अनावरण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

जोडप्यांमध्ये कधीही अव्यक्त होणारी भाषा लक्षात घेऊन 'प्लॅटिनम लव्ह बँड्स'ने त्यांच्या नवीन हंगामी संग्रहाचे अनावरण केले. विश्वासात रुजलेल्या प्रत्येक प्रेमकथेची स्वतःची अशी बोलीभाषा असते, जी जगाला समजू शकत नाही. हा संग्रह त्या शांत नात्यांचे रूपांतर तुम्ही परिधान करू शकता अशा गोष्टींत करते, अशी गोष्ट जी तुम्ही आयुष्यभर जपू शकता. ही गोष्ट म्हणजे फक्त अंगठी नाही, ते तुमच्या खासगी भाषेचा भाग आहेत. एका वैयक्तिक बंधनाचे प्रतीक आहेत, फक्त तुम्ही दोघेच त्यांची कहाणी जाणता. ९५ टक्के शुद्ध प्लॅटिनमपासून बनवलेले हे बँड अढळ आणि खरे अनुबंध दर्शवतात, जे धातूच्या ताकद आणि लवचिकतेचे प्रतिबिंब आहेत.



# डॉ. सुधीरजी तांबे यांच्या हस्ते दै. समर्थ गांवकरी दिवाळी अंकाचे प्रकाशन

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

नाशिक येथे उत्साही व सांस्कृतिक वातावरणात दैनिक समर्थ गांवकरी या वृत्तपत्राच्या दिवाळी अंक प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे ज्येष्ठ राजकारणी, समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते तसेच कार्यसम्राट माजी आमदार माननीय डॉ. सुधीरजी तांबे उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी त्यांना शाल, पुष्पगुच्छ व घड्याळ भेट देऊन त्यांचा डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सत्कार केला.

या प्रसंगी दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक तसेच



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री. राजू पाटील, दैनिक समर्थ गांवकरी चे महाव्यवस्थापक श्री. संजय फुलसुंदर, सेवानिवृत्त सैनिक नामदेव लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते अशोक पाटील, पत्रकार संतोष स्वामी, मधुकर भोर तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून मातृशक्ती, समाजसेवा आणि पत्रकारिता या तिन्ही क्षेत्रांतील योगदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. उपस्थित पाहुण्यांनी दै. समर्थ गांवकरी या वृत्तपत्राच्या ग्रामीण पत्रकारितेतून समाजात होत असलेल्या प्रभावी कार्याचा गौरव केला. आपल्या प्रेरणादायी मनोगतात डॉ. सुधीर तांबे यांनी सांगितले की, "पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्याचे माध्यम नाही, तर ती समाजाला दिशा देणारी शक्ती आहे. समर्थ गांवकरी सारखी वृत्तपत्रे ग्रामीण भागातील प्रश्न, शेतकऱ्यांच्या समस्या, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराशी संबंधित बाबी पुढे आणून समाजजागृतीचे कार्य करत आहेत. अशा पत्रकारितेची आजच्या काळात अत्यंत आवश्यकता आहे."

डॉ. तांबे यांनी पुढे सांगितले की, "पत्रकार हा समाजाचा आरसा आहे. तो भीती न बाळगता, सत्य मांडतो. त्यामुळे माध्यमांना जबाबदारी आणि प्रामाणिकपणाचे भान ठेवणे अत्यावश्यक आहे. समर्थ गांवकरीने ते यशस्वीरीत्या पाळले आहे, हे अभिमानास्पद आहे." या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांनी आपल्या भाषणात वृत्तपत्राच्या प्रवासाचा आढावा घेत सांगितले की, "ग्रामीण भागातील लोकांपर्यंत सत्य आणि निर्भीड बातम्या पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न नेहमीच राहिला आहे. समाजातील प्रत्येक घटकाला आवाज मिळावा, हा आमचा हेतू आहे." यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष श्री. राजू पाटील यांनी संघटनेच्या उपक्रमांची माहिती दिली आणि पत्रकारांच्या हक्कांसाठी संघ कटीबद्ध असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या अखेरीस दैनिक समर्थ गांवकरी च्या दिवाळी अंकाचे मान्यवरांनी कौतुक केले. अंकातील साहित्य, सामाजिक विषयांवरील लेख आणि ग्रामीण विकासाशी संबंधित लेखन याबद्दल प्रशंसा व्यक्त केली. उपस्थित मान्यवरांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत, पत्रकारितेच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य अधिक जोमाने पुढे न्यायावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. या प्रकाशन सोहळ्यामुळे नाशिकमध्ये दैनिक समर्थ गांवकरी च्या कार्याची नव्या उंचीवर झेप घेतली असून, सामाजिक आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात हा दिवस संस्मरणीय ठरला.

# एनएसई आणि बीएसईवर प्रस्तावित लिस्टिंगची केली घोषणा

मुंबई : (समर्थ गांवकरी)




भारतातील प्रमुख उच्च-मागणी असलेल्या सूक्ष्म-बाजारांमध्ये लक्झरी आणि उच्च-स्तरीय हॉटेल्सची आघाडीची मालकी असलेल्या ॲडव्हेंट हॉटेल्स इंटरनॅशनल लिमिटेडने १३ नोव्हेंबर रोजी नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) आणि बीएसई लिमिटेडवर त्यांच्या इक्विटी शेअर्सची प्रस्तावित लिस्टिंगची घोषणा केली. ही लिस्टिंग ॲडव्हेंटच्या समर्पित हॉस्पिटॅलिटी प्लॅटफॉर्म म्हणून प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामुळे बाजारातील दृश्यमानता, विद्यमान भागधारकांसाठी तरलता आणि भविष्यातील वाढीला पाठिंबा देण्यासाठी एक मजबूत भांडवली रचना सक्षम होते. व्हॅलर इस्टेट लिमिटेड (पूर्वी डीबी रिअल्टी लिमिटेड) पासून वेगळे झाल्यानंतर, ॲडव्हेंट हॉटेल्स इंटरनॅशनल आता संपूर्ण भारतातील प्रमुख हॉटेल मालमत्ता विकसित करण्यासाठी, मालकी मिळविण्यासाठी आणि व्यवस्थापित करण्यासाठी केंद्रित धोरणासह स्वतंत्रपणे काम करते. विभाजनानंतर, कंपनी तिच्या स्वतःच्या बोर्ड आणि व्यवस्थापन टीमद्वारे नियंत्रित केली जाईल. ॲडव्हेंट हॉटेल्स इंटरनॅशनल लिमिटेडचे प्रमोटर डायरेक्टर श्री. अर्शद बलवा म्हणाले, "ॲडव्हेंट हॉटेल्स इंटरनॅशनलची यादी संस्थात्मकदृष्ट्या चालणारी आणि भांडवल-कार्यक्षम हॉस्पिटॅलिटी प्लॅटफॉर्म तयार करण्याच्या आमच्या वचनबद्धतेला बळकटी देते. दीर्घकालीन शेअरहोल्डर मूल्य निर्मितीवर लक्ष केंद्रित करणारे एक सुव्यवस्थित, ऑपरेशनलदृष्ट्या उत्कृष्ट हॉटेल प्लॅटफॉर्म तयार करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. पुढील दशकात काळजीपूर्वक अधिग्रहण आणि शिस्तबद्ध भांडवल वाटपाद्वारे मध्यम-किशोरवयीन मुलांसाठी चक्रवाढ ROE प्रदान करणे हे आमचे ध्येय आहे."

ॲडव्हेंट हॉटेल्स इंटरनॅशनल सध्या दोन प्रमुख हॉटेल्स चालवते: गोव्यातील बांबोलीम येथे ३१३-की-फ्लॅग्ड ग्रँड हयात-फ्लॅग्ड प्रॉपर्टी (आणि ११३ अतिरिक्त की-फ्लॅग्ड प्रॉपर्टी निर्माणाधीन) आणि अंधेरी पूर्व, मुंबई येथे १७१-की-फ्लॅग्ड हिल्टन-ब्रँडेड प्रॉपर्टी.



पुणे : डिजिटल छपाई उपायांमध्ये आघाडीवर असलेल्या कॅनन इंडियाने आज आधुनिक कार्यस्थळांच्या गरजांसाठी तयार करण्यात आलेल्या नव्या 'इमेजफोर्स' मालिकेचे अनावरण केले. या मालिकेत रंगीत सी५१०० व कृष्णधवल ६१०० अशा दोन श्रेणी असून, या बहुउपयोगी यंत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने चालणारी स्मार्ट देखभाल, सुरक्षित माहिती प्रणाली, मेघजोडणी (क्लाउड कनेक्टिव्हिटी), तसेच उच्च दर्जाची छपाई क्षमता अशी वैशिष्ट्ये आहेत. कॅनन इंडियाचे अध्यक्ष तोशियाकी नोमुरा यांनी सांगितले की, कार्यालयीन कामकाज झपाट्याने डिजिटल होत असताना अधिक चपळ, जोडलेली व सुरक्षित साधने आवश्यक ठरत आहेत. ग्राहकांना अशा तंत्रज्ञानाद्वारे सक्षम करणे हे कॅननचे ध्येय आहे, जे कार्यक्षमतेसोबत माहितीची सुरक्षितता आणि पर्यावरणपूरकता राखते. या नव्या मालिकेद्वारे कॅननने कार्यालयीन यंत्रसामग्री क्षेत्रात आपले अग्रस्थान अधिक दृढ केले आहे.

## थोडक्यात बातम्या...

### आयशर ट्रक्स अँड बसेसने आयशर प्रो एक्स डिझेल श्रेणी लाँच केली आहे

मुंबई (स. गांवकरी) : व्हीई कमर्शियल व्हेईकल्स (व्हीईसीव्ही) चे व्यवसाय युनिट आयशर ट्रक्स अँड बसेसने आज आयशर प्रो एक्स डिझेल लाँच करण्याची घोषणा केली, ज्यामुळे त्यांची श्रेणी वाढली. आयशर ट्रक्स अँड बसेसने २-३.५-टन लहान व्यावसायिक वाहन (एससीव्ही) विभागातील त्यांच्या नवीन पिढीच्या ऑफरचा विस्तार केला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला इंडिया मोबिलिटी ग्लोबल एक्स्पोमध्ये आयशर प्रो एक्स ईव्हीच्या यशस्वी लाँचनंतर, डिझेल व्हेरिएंटच्या सादरीकरणात आयशरची इंधन कार्यक्षमता आणि डिझेल-चालित उपायांची आवश्यकता असलेल्या ग्राहकांसाठी आणि क्षेत्रांसाठी अनुप्रयोग उत्कृष्टतेमध्ये उद्योग-अग्रणी कौशल्य एकत्र केले आहे.व्यावसायिक वाहन उद्योगात चार दशकांहून अधिक काळ नेतृत्वासह, आयशर ट्रक्स अँड बसेस नवीन आयशर प्रो एक्सद्वारे शेवटच्या मैलाच्या लॉजिस्टिक्समध्ये परिवर्तन करण्यासाठी वचनबद्ध आहे. ग्राहकांच्या सहकार्याने विकसित केलेली आणि "तज्ञ" उपाय म्हणून डिझाइन केलेली, ही नवीन डिझेल श्रेणी लहान व्यवसाय, फ्लीट ऑपरेटर आणि पहिल्यांदाच वाहन खरेदी करणाऱ्यांना उत्कृष्ट कामगिरी, उत्कृष्ट अपटाइम आणि अखंड मालकी अनुभव देण्यासाठी सज्ज आहे. आयशर प्रो एक्स विशेषतः विकसित केलेल्या "सर्व-नवीन" E449 - X-फॅक्टर डिझेल इंजिनसह येते, जे सर्वोत्तम-इन-क्लास इंधन कार्यक्षमता आणि शक्ती प्रदान करते, ज्यामुळे ते सर्व भूप्रदेशांवर ऑपरेट करण्यास सक्षम होते. हे उत्कृष्ट ड्रायव्हिंग आणि कामगिरी सुनिश्चित करते. यात सेगमेंटचा सर्वात मोठा कार्गो डेक (१० फूट ८ इंच) आणि सर्वात लांब सेवा अंतराल (३०,००० किमी) आहेत, जे अतुलनीय अपटाइम सुनिश्चित करतात. या वैशिष्ट्यांच्या संयोजनामुळे ग्राहकांना प्रत्येक ट्रिपमध्ये अधिक माल वाहून नेणे, ऑपरेटिंग खर्च कमी करणे आणि नफा वाढवणे शक्य होईल. या प्रसंगी बोलताना, व्हीई कमर्शियल व्हेइकल्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विनोद अग्रवाल म्हणाले: "आयशर प्रो एक्स डिझेलच्या लाँचिंगसह, आम्ही भारतातील शेवटच्या मैलाच्या लॉजिस्टिक्समध्ये परिवर्तन घडवून आणण्याच्या दिशेने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आहोत. आयशर प्रो एक्स रेंज - आता इलेक्ट्रिक आणि डिझेल दोन्ही प्रकारांमध्ये उपलब्ध आहे - भारतातील अमृत कालमध्ये लॉजिस्टिक्सला आकार देत असताना आमच्या ग्राहकांना त्यांच्या प्रवासात सामील होण्याची आमची वचनबद्धता दर्शवते. ही रेंज ग्राहकांच्या सहकार्याने विकसित केली गेली आहे आणि इंधन कार्यक्षमता, विश्वासार्हता आणि उत्कृष्ट अपटाइममधील आयशरची सिद्ध कौशल्ये आणि अनेक व्यवसाय डिझेल पॉवरट्रेनकडून अपेक्षित असलेल्या ऑपरेशनल लवचिकतेला एकत्र करते.

### 'स्पेक्टॅक्युलर सौदी' मुंबईत पुन्हा आगमन

मुंबई (स. गांवकरी) : अरबस्थानाच्या हृदयाची धडक पुन्हा एकदा मुंबईत जाणवणार आहे कारण सौदीचे राष्ट्रीय पर्यटन ब्रँड, "सौदी, वेलकम टू अराबिया," त्यांचा प्रसिद्ध अनुभवात्मक कार्यक्रम "स्पेक्टॅक्युलर सौदी" पुन्हा मुंबईत घेऊन येत आहे. फिनिक्स पॅलाडियम मॉलमध्ये २१ ते २३ नोव्हेंबर दरम्यान हा तीन दिवसांचा उत्सव सुरू होणार असून, या उत्सवानं नेहमीप्रमाणेच एक खास अनुभूती देण्याचे वचन दिले आहे. शहराच्या गडबडीतून दूर, आरश्यासारख्या दृश्यांमध्ये, वाळवंटातील संगीताच्या सुरांत आणि सौदी कॉफीच्या खास सुवासात थेट प्रवास करायला मिळणार आहे. गेल्या वर्षीच्या आवृत्तीत मुंबईकरांना सौदीचे पहिले अनुभवन मिळाले होते, तर यंदाची आवृत्ती त्यांना सौदीच्या हृदयात आणखी खोलवर घेऊन जाणार आहे. यावेळी, प्रथमच, हे आमंत्रण मुंबईसह दिल्ली, अहमदाबाद, हैदराबाद आणि बंगळुरू या पाच भारतीय शहरांमध्ये दिले जात आहे. "स्पेक्टॅक्युलर सौदी २०२५" मध्ये सौदीच्या संस्कृती, पाककला आणि सर्जनशीलतेचे एकत्रित दर्शन घडणार आहे—"द एसेंस ऑफ सौदी" मध्ये वारसा आणि डिझाईनचा उत्सव, "ब्रूटोपिया: अॅ कावा एक्सपीरियन्स" मध्ये बखूर आणि कॉफीच्या सुगंधासोबत खास अनुभव, आणि "एपिक्युरियन-क्युलिनरी कॉर्नर" मध्ये पारंपरिक आणि आधुनिकतेचा मिलाफ असलेली सौदीची बदलती खाद्यकथा खास अंदाजात सादर होणार आहे.

### फोनपे आणि ओपन एआय यांची मोठी भागीदारी

पुणे (स. गांवकरी) : फोनपेने आज, जगातील आघाडीच्या एआय कंपनी, ओपनएआय , सोबत एका मोठ्या भागीदारीची घोषणा केली. भारतातील सामान्य लोकांमध्ये चॅटजीपीटी चा वापर वाढवणे आणि दोन्ही कंपन्यांची एकत्र वाढ होण्यास मदत करणे, हा यामागचा उद्देश आहे. या भागीदारीमुळे फोनपे वापरकर्त्यांना फोनपे प्लॅटफॉर्मवरच चॅटजीपीटीच्या सुविधा वापरून पाहता येतील, ज्यामुळे अधिक भारतीयांना प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेची ताकद अनुभवता येईल. ही भागीदारी फोनपे ॲपवरील वापरकर्त्यांचा अनुभव अधिक चांगला करू शकते, कारण यामुळे त्यांना प्रवासाचे प्लॅनिंग करण्यापासून ते खरेदी करण्यापर्यंतच्या रोजच्या गरजांसाठी अधिक स्मार्ट आणि उपयोगी माहिती मिळेल. या भागीदारीमुळे, चॅटजीपीटी हे फोनपे च्या ग्राहक ॲपवर आणि फोनपे बिजनेस ॲपवर सहज उपलब्ध होईल. तसेच ते इंडस ॲपस्टोअर सह फोनपे च्या संपूर्ण नेटवर्कच्या क्षमतेचा आधार घेईल. देशात जनरेटिव्ह एआय चा वापर वाढत असताना, ही भागीदारी वापरकर्त्यांसाठी वापराच्या नवीन संधी निर्माण करण्यास मदत करेल. या घोषणेप्रसंगी बोलताना, फोनपे चे संस्थापक, पूर्ण-वेळ संचालक आणि मुख्य तंत्रज्ञान अधिकारी राहुल चारी म्हणाले, "फोनपे मध्ये, आम्ही कोट्यवधी लोकांसाठी डिजिटल सेवांचा पाया तयार करण्यात अनेक वर्षे मेहनत घेतली आहे. ही मोठी भागीदारी हे दाखवून देते की, या क्षेत्रातील नवीन विचार करणाऱ्या कंपन्यांनी एकत्र काम केल्यास, अगदी नवीन तंत्रज्ञान जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यास मदत होऊ शकते. ओपेनएआय सोबत हा प्रवास सुरू करण्यासाठी आम्ही खूप उत्सुक आहोत." ओपन एआय चे आंतरराष्ट्रीय प्रमुख ऑलिव्हर जे, म्हणाले, "संपूर्ण भारतातील लोकांपर्यंत एआय अधिक सोपे करून पोहोचवण्याच्या आमच्या ध्येयामधील, फोनपे सोबतची आमची भागीदारी हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारत हे नवनवीन शोधांचे जागतिक केंद्र आहे, आणि फोनपेला भारताची नस आणि इथल्या वापरकर्त्यांची जी सखोल जाण आहे.

# आदिवासी उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रोत्साहन देणार केंद्र सरकार

- वाणिज्य व उद्योग मंत्री श्री पीयूष गोयल
- श्री पियुष गोयल यांनी आदिवासी समुदायांना सक्षम करण्यासाठी आणि त्यांची कारागिरी जागतिक स्तरावर प्रदर्शित करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले.
- श्री गोयल यांनी "वन धन ते व्यापार धन" असा बदल घडवण्याचे आवाहन केले.

भौगोलिक संकेतांक (GI) प्रमाणपत्रांचे वितरण : कार्यक्रमात देशभरातील आदिवासी कारागिरांच्या कौशल्याचा सन्मान म्हणून भौगोलिक संकेतांक (GI) प्रमाणपत्रांचे वितरण देखील करण्यात आले. केरळचे कन्नडिप्पया (बांबू चटई), अरुणाचल प्रदेशचे अपतानी टेक्सटाईल, तामिळनाडूचे मार्थंडम हनी, सिक्कीमचे लेप्चा तुंगबुक, आसामचे बोडो आरोनाई, गुजरातचे अंबाजी व्हाईट मार्बल, आणि उत्तराखंडचे बेड आणि बादरी गाईचे तूप या उत्पादनांना त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आणि ओळखीबद्दल मान्यता मिळाली. ही मान्यता आदिवासी उत्पादनांना बाजारपेठेतील प्रवेश, ब्रँड मूल्य आणि राष्ट्रीय स्तरावरील ओळख वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे कारागीर सशक्त होतील आणि भारताचा समृद्ध स्थानिक वारसा जपला जाईल.

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री श्री पीयूष गोयल यांनी सांगितले की निर्यातीची क्षमता असलेल्या सर्व आदिवासी उत्पादनांना वाणिज्य विभागाकडून पूर्ण मदत दिली जाईल. ही मदत ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म, आंतरराष्ट्रीय गोदामे (उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्रीसाठी), तसेच घाऊक आणि किरकोळ व्यापार नेटवर्कद्वारे दिली जाईल. श्री गोयल हे आज नवी दिल्ली येथे झालेल्या ट्रायबल बिझनेस कॉन्क्लेव्ह 2025 या कार्यक्रमात बोलत होते. या प्रसंगी केंद्रीय आदिवासी कार्य मंत्री श्री जुएल ओराम देखील उपस्थित होते.वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग (डीपीआयआयटी) आणि आदिवासी कार्य मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. भगवान बिरसा मुंडा यांच्या 150व्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या 'आदिवासी गौरव वर्ष' दरम्यान हा एक ऐतिहासिक क्षण ठरला. श्री गोयल यांनी माहिती दिली की आदिवासी उत्पादनांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत योग्य ओळख आणि स्थान मिळावे यासाठी निर्यात प्रोत्साहन वाढविण्याची एक नवी योजना तयार केली जात आहे.श्री गोयल यांनी सांगितले की देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय दोन्ही बाजारपेठांमध्ये आदिवासी वस्तूंना आणि हस्तकलांना मोठी संधी आहे. या संधीचा पूर्ण लाभ घेण्यासाठी सरकार येत्या काही वर्षांत आवश्यक उपाययोजना करत आहे.

श्री गोयल म्हणाले की पंतप्रधानांचा ठाम विश्वास आहे की देशाचा खरा विकास तेव्हाच होऊ शकतो, जेव्हा आदिवासी समाज प्रगती करेल. त्यांनी सांगितले की भारताचा विकास आणि प्रगती ही प्रत्येक घरापर्यंत, विशेषतः आदिवासी आणि दुर्गम भागांपर्यंत, विकास पोहोचवण्यावर अवलंबून आहे. श्री गोयल यांनी पुन्हा सांगितले की आदिवासी आणि स्थानिक समुदायांचा विकास हा सरकारचा सर्वात महत्त्वाचा उद्देश आहे, ज्यातून सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाबद्दल सरकारची बांधिलकी दिसून येते. श्री गोयल यांनी भगवान बिरसा मुंडा यांना श्रद्धांजली वाहताना सांगितले की त्यांनी आदिवासी समाजाला दिशा आणि मार्गदर्शन दिले. त्यांनी म्हटले की देशाने बिरसा मुंडा यांच्या जीवनातून प्रेरणा घ्यावी आणि त्यांच्या मार्गावर चालत आदिवासी समाजाचा विकास करावा, त्यांचे उत्पन्न वाढवावे आणि प्रत्येक आदिवासी कुटुंब आनंदी व समृद्ध व्हावे यासाठी प्रयत्न करावेत. श्री गोयल यांनी बिरसा मुंडा यांचे "आपली जमीन, आपले राज्य" शब्द आठवले आणि सांगितले की आदिवासी समाजाने ऐतिहासिकदृष्ट्या अनेक संकटे आणि अन्याय सहन केले आहेत. श्री गोयल यांनी अनेक अडचणींनंतरही आपली संस्कृती, मूल्ये, हस्तकला आणि परंपरा जपल्याबद्दल आदिवासी समाजाचे कौतुक केले.

## "एक दिन अपना घर होगा"

पुणे : (समर्थ गांवकरी)



प्रत्येक मध्यमवर्गीय माणसासाठी स्वतःचे घर बांधणे हे फक्त विटा-भिंतींचे स्वप्न नसतेतर ते अभिमान, स्थैर्य आणि प्रेमाचे प्रतीक असते. 'घर की लक्ष्मी बेटियाँ', 'मीत' आणि इतर अनेक लोकप्रिय मालिकांमधील दमदार अभिनयासाठी ओळखले जाणारे राजेंद्र चावला आता झी टीव्हीवरील नवीन मालिकेत 'लक्ष्मी निवास' मध्ये श्रीनिवासच्या भूमिकेत दिसणार आहेत. ही भूमिका या भावनेशी अगदी मिळतीजुळती आहे. त्यांच्या पात्राप्रमाणेच, राजेंद्र यांनीही कठोर परिश्रम आणि आशेवर उभे असलेले स्वतःचे घर असावे या साध्या पण हृदयस्पर्शी स्वप्नासाठी आयुष्यभर प्रयत्न केले आहेत. 'लक्ष्मी निवास' या मालिकेत श्रीनिवास हा एक प्रामाणिक आणि निःस्वार्थी कुटुंबवत्सल माणूस आहे.

## शक्ती एनर्जी सोल्यूशन्सतर्फे आघाडीचे स्थान पक्के

पुणे : (समर्थ गांवकरी)



शक्ती एनर्जी सोल्यूशन्स प्रा. लि. तर्फे आज 'शक्ती ऑन रूफ' या नव्या पिढीच्या सोलार रूफटॉप सिस्टीम्सच्या लाँचची घोषणा करण्यात आली. उत्कृष्ट कार्यक्षमता, टिकाऊपणा आणि स्मार्ट ऊर्जा कार्यक्षमतेसाठी या सिस्टीम डिझाइन करण्यात आल्या आहेत.

हे अनावरण म्हणजे भारतातील अक्षय ऊर्जाक्षेत्रातील कंपनीच्या नेतृत्वाला अधिक बळकटी मिळण्याच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. हा उपक्रम एआय-आधारित शाश्वत नवकल्पनांच्या कंपनीच्या दृष्टीकोनाशी सुसंगत आहे. पूर्वाश्रमीची शक्ती सोलार रूफटॉप सोल्यूशन्स आता शक्ती ऑन रूफ या नव्या ब्रँड आयडेंटिटीसह अवतरली आहे.

'मेक इन भारत, मेड फॉर भारत' या तत्त्वाशी सुसंगत राहून स्थानिक नवकल्पना आणि भारतीय हवामानानुसार विकसित केलेल्या अभियांत्रिकी कौशल्याला अधिक प्रोत्साहन आणि बळकटी हा नवा ब्रँड देणार आहे. महाराष्ट्रात याची सुरुवात झाली असून 'शक्ती ऑन रूफ' सोलार रूफटॉप सिस्टिम्स प्रत्येक राज्यासाठी स्थानिक गरजेनुसार तयार करण्यात आल्या आहेत आणि त्याद्वारे महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये सौरऊर्जेचा स्वीकार वेगाने वाढविण्यास कंपनीला मदत होईल.

या घोषणेबद्दल शक्ती एनर्जी सोल्यूशन्सचे सीईओ श्री. रामकृष्ण सतलुरी म्हणाले, "भारतातील प्रत्येक छतावर पर्यावरणस्नेही ऊर्जा निर्माण व्हावी, ही शक्ती ऑन रूफ या नव्या नावामागची मध्यवर्ती संकल्पना आहे. शक्ती ऑन रूफच्या उत्कृष्ट दर्जाच्या उपाययोजना मेक इन भारत, मेड फॉर भारत या तत्वाअंतर्गत तयार करण्यात आल्या आहेत. खास भारतीय वातावरणासाठी तयार करण्यात आलेल्या या रूफटॉप सिस्टीम्समुळे अधिक ऊर्जानिर्मिती, अधिक टिकाऊपणा आणि टोकाच्या हवामानातही उत्तम परफॉरमन्स मिळतो.

## किसना डायमंड मॅरेथॉन २०२५ 'स्वच्छ भारत मोहिमे'साठी १०० शहरांना एकत्र करेल

मुंबई : (समर्थ गांवकरी)



भारत - भारतातील आघाडीची आणि सामाजिकदृष्ट्या समर्पित हिरे कंपनी हरी कृष्णा ग्रुपने घोषणा केली आहे की किसना डायमंड मॅरेथॉन - रन फॉर क्लीन इंडिया - ची १० वी आवृत्ती २८ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित केली जाईल. या वर्षी, प्रथमच, मॅरेथॉन राष्ट्रीय स्तरावर, एकाच वेळी १०० भारतीय शहरांमध्ये आयोजित केली जाईल. किसना डायमंड आणि गोल्ड ज्वेलरीच्या विस्तृत रिटेल नेटवर्कद्वारे समर्थित, हा कार्यक्रम देशातील सर्वात मोठ्या सामाजिक फिटनेस मोहिमांपैकी एक बनण्यास सज्ज आहे. गेल्या नऊ वर्षांत, किसना डायमंड मॅरेथॉनने ३६,००० हून अधिक धावपटूंना स्वच्छ आणि निरोगी भारतासाठी प्रेरित केले आहे. हा उपक्रम एक संपूर्ण सामाजिक आणि राष्ट्रीय सेवा चळवळ आहे, ज्यामध्ये सहभागींकडून गोळा केलेल्या नोंदणी शुल्कापैकी १००% 'स्वच्छ भारत मोहिमे' अंतर्गत स्वच्छता, स्वच्छता आणि सामुदायिक आरोग्य सुधारणा प्रकल्पांमध्ये योगदान दिले जाते. २८ डिसेंबर २०२५ रोजी देशभरातील १०० शहरांमध्ये एकाच वेळी होणारी ही मॅरेथॉन एक अनोखी स्पर्धा असेल जी केवळ फिटनेसला प्रोत्साहन देणार नाही तर देशात सामाजिक जागरूकता आणि नागरी जबाबदारीची भावना देखील बळकट करेल. सहभागींना अधिकृत मॅरेथॉन टी-शर्ट, कॅप्स, बिब नंबर, फिनिशर मेडल, गुडी बॅग्ज आणि रिफ्रेशमेंट्स कार्यक्रमस्थळी प्रदान केले जातील. मुंबईतील मुख्य कार्यक्रम भारत डायमंड बोर्स (BKC) येथे भव्य कार्यक्रम होईल, ज्यामध्ये हजारो सहभागी उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. या प्रसंगी बोलताना, किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. घनश्याम ढोलकिया म्हणाले, "किसना डायमंड मॅरेथॉन ही केवळ एक शर्यत नाही तर एक जनजागृती चळवळ आहे. गेल्या नऊ वर्षांपासून, स्वच्छ भारत मिशनला पाठिंबा देण्यासाठी हजारो लोक आमच्यात सामील झाले आहेत.

## पाणीपुरीचा प्रीमियर टाटा प्ले मराठी सिनेमावर

पुणे : (समर्थ गांवकरी)



आधुनिक नातेसंबंधांच्या गोड-तिखट जगात घेऊन जाणारा 'पाणीपुरी' हा चित्रपट आता केवळ टाटा प्ले मराठी सिनेमा या वाहिनीवर प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. १४ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर या काळात हा सिनेमा प्रदर्शित होणार असून तो प्रेम, गैरसमज आणि पुन्हा एकदा एकमेकांकडे वळण्याच्या प्रवासाची मनाला भिडणारी कहाणी सांगतो. चार जोडपी आणि एक तडफदार वकील यांच्या गोंधळातून उलगडणारे विनोद, भावनांचे रंग आणि नात्यांचे वेगवेगळे पैलू यांचा हा प्रवास प्रेक्षकांना हसवतानाच विचार करायलाही भाग पाडतो. या चित्रपटात मकरंद देशपांडे आणि भारत गणेशपुरे यांसारखे ताकदीचे कलाकार प्रमुख भूमिकेत असून त्यांच्या अभिनयामुळे कथा जिवंत झाली आहे.

# ईमामी लिमिटेडने धोरणात्मक रिब्रँडिंगची घोषणा केली

मुंबई : (समर्थ गांवकरी)




केश किंग, भारताचा अग्रगण्य आयुर्वेदिक हेअरकेअर ब्रँड आहे. ह्या ब्रँडने स्वतःचा एक रूपांतरात्मक रिब्रँडिंगचा पुढाकार घेऊन सादर केले आहे केश किंग गोल्ड. यामुळे ब्रँडची ओळख, प्रस्ताव आणि पॅकेजिंगला एक नवा आणि आकर्षक दर्जा मिळाला आहे. ह्या रिब्रँडिंगच्या पुढाकाराने ईमामीने आपल्या ब्रँड केश किंग ब्रँडसाठी एक वेगळी धोरण आत्मसात केली आहे. आता हे आपल्या पारंपारिक आयुर्वेदिक मूळांपर्यंत मर्यादित नाही, तर, हा एक दमदार नवा विचार आत्मसात केला आहे: आयुर्वेद + विज्ञान.

उत्पादनाच्या ह्या नव्या स्वरूपामुळे ग्राहकांना उत्तम गुणवत्ता, प्रभावकारकता आणि उपयोगाचा फायदा मिळेल आणि तेसुद्धा एका नव्या रूपात. ब्रॅण्डची आयुर्वेदिक परंपरा न बिघडवता, हे नवे उत्पादन ग्राहकांची मागणी लक्षात ठेवून तयार करण्यात आले आहे. आजकालच्या काळात ग्राहक खरेपणा, कामगिरी आणि वैज्ञानिकरीत्या प्रमाणित उत्पादने पसंत करतात. केश किंग गोल्ड ग्राहकांच्या सर्व मागण्या पूर्ण करते कारण ह्यात आहे ग्रो बायोटिन आणि प्लांट ओमेगा 3-6-9 सारखे प्रमुख वैज्ञानिक घटक व सोबत 21 विश्वसनीय आयुर्वेदिक वनौषधिंचे शक्तिशाली सक्रिय संघटक. केस उगवणे आणि केस गळणे कमी करण्यात ह्या उत्पादनांची उपयुक्तता क्लिनिकली प्रमाणित आहे. ह्या धोरणात्मक बदलाचा भाग म्हणून केश किंग केसांशी संबंधित असलेल्या वाढत्या समस्यांसाठी काही नवीन कॅटेगरीज मध्ये आपला प्रवेश करीत आहे. ह्या प्रवेशाद्वारे समस्यांसाठी उपयोगी समाधाने मिळतील. केस वाढ ही अजुनही एक महत्त्वाची अपूर्ण गरज आहे, हे ओळखून, ह्या ब्रँडने केश किंग गोल्ड रेंजच्या अंतर्गत आणले आहे एक नवे आधुनिक उत्पादन, ॲडव्हांस्ड हेअर ग्रोथ सिरम. ह्या सिरम पॅकमध्ये सर्वात जास्तं प्रमाणात आहे ग्रोथ ॲक्टिव्हस - आयुर्वेदिक वनौषधि आणि रेडेंसिल, ॲनागेन, कोपोक्सिल ॲक्वा आणि प्रोकॅपिल सारख्या शक्तिशाली मॉलिक्युल्सचे अद्वितीय मिश्रण- जे प्रत्यक्ष दाखवते केसांची वाढ.

ह्या वेळेस आपला शब्द ठेवून सौ. प्रीति ए. सुरेका, एक्झेक्युटिव्ह डायरेक्टर, ईमामी लिमिटेड, म्हणाल्या, "केश किंगचे हे रिब्रँडिंग फक्त देखाव्यासाठी केलेला बदल नही, - तर ह्यात धोरणात्मकरीत्या उल्लेखनीय बदल करण्यात आले आहेत. हा ब्रँड केसांच्या संपूर्ण देखरेखीत केश किंगला गोल्ड स्टँडर्ड म्हणून स्थापित करु इच्छितो, जे त्यांच्या भविष्यातील योजनांचा एक भाग आहे. केश किंग गोल्डमध्ये आयुर्वेदाचे ज्ञान आणि आधुनिक संशोधनाच्या परिणामांना एकत्र करण्यात आले आहे. ही नवी ओळख विशेषरीत्या त्या पीढीसाठी तयार करण्यात आली आहे, जी विश्वस्नीय घटक, दृष्यमान कार्यप्रभाव आणि महत्त्वाकांशी प्रगत मूल्यांची उमेद ठेवतात आणि प्रत्यक्षात परिणाम बघू इच्छितात."

पूर्वीप्रमाणे, ब्रँड ॲम्बॅसेडर शिल्पा शेट्टीच केश किंग एंडॉर्स करेल आणि वेलनेस आयकॉन म्हणून तिच्या ओळखीने ब्रँडच्या तत्त्वज्ञानांना विश्वसनीयता आणि विश्वास मिळू शकेल. प्रचाराच्या नव्या धोरणात्मकतेत ग्राहकांच्या खऱ्या अनुभवांवर जास्त भर दिला जाईल. प्रभावीपणाच्या वास्तविक दावांसह ब्रँडची नवीन ओळख सर्वांच्या पुढे सादर करण्यात येइल. सादरीकरण जास्त यशस्वी बनविण्यासाठी, केश किंगद्वारे टेलिव्हिजन, डिजिटल प्लॅटफॉर्म, प्रिंट मिडिया आणि इन-स्टोर चॅनेल्समधून एक दमदार 360-डिग्री इंटिग्रेटेड कॅम्पेन सुरू करण्यात येईल. ह्याचा पुनर्प्रारंभ करुन उत्पादन जास्त चांगले असल्याची माहिती ग्राहकांपर्यंत पोचवणे आणि प्रमुख बाजारांमध्ये सर्वोच्च स्थानाला मजबूत बनवणे, ह्यावर जास्त जोर दिला जाईल. त्यामुळे विश्वस्नीय, उपयुक्त हेअरकेअर सोल्युशन हवे असणारे जुने भरोशाचे ग्राहक आणि नवे ग्राहक, दोघांनाही शोध घेता येईल.